## देशात आर्थिक विषमतेत वाढ


पान ३ वर


# कृषीवल

रायगड ॥ गुरुवार, दिनांक १७ फेब्रुवारी २०२२

किंमत ४ ₹


## भुवनेश्वर मंदिरात चांदीचा मुखवटा चोरीस

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

तालुक्यातील नारंगी येथील पुरातन भुवनेश्वर मंदिरातील शिवलिंगावरील चांदीच्या मुखवट्याची चोरी झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. दरवाजाचे टाळे फोडून सुमारे अडीच लाख रुपये किंमतीचा हा मुखवटा चोरला आहे. याबाबतचे वृत्त असे की, अलिबाग तालुक्यातील नारंगी येथे स्वयंभू भुवनेश्वर मंदिर आहे. या मंदिरातील शिवलिंगावर ६ किलो वजनाचा चांदीचा मुखवटा बसविण्यात आला आहे. नेहमीप्रमाणे बुधवारी सकाळी मंदिराचे पुजारी गंगाधर सदाशिव म्हात्रे हे मंदिर उघडण्यासाठी पान २ वर

## महत्वाचे

### बप्पी दा कालवश

**मुंबई :** ज्येष्ठ गायक-संगीतकार बप्पी लहिरी (वय ६९) यांचे



निधन झाले. मुंबईतील रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु होते. बप्पीदा यांच्या निधनाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह बॉलीवूडमधील सेलिब्रेटींनी शोक प्रकट केला आहे.बप्पी लहिरी हे मनोरंजन विश्व आणि चाहत्यांमध्ये 'बप्पी दा' या नावाने लोकप्रिय होते. बप्पी लहिरी हे भारताला डिस्को संगीताची ओळख करुन देणाऱ्या गायकांपैकी एक मानले जातात.

### डोवाल यांच्या घरात घुसखोरी

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार आणि भारतीय गुप्तचर यंत्रणेचे सर्वोच्च अधिकारी अजित डोवाल यांच्या सरकारी बंगल्यामध्ये बुधवारी (१६ फेब्रुवारी) सकाळी एक अज्ञात व्यक्तीने कारसहीत अजित घुसण्याचा प्रयत्न केला. यावेळी बंगल्याच्या सुरक्षारक्षकांनी प्रसंगावधान दाखवत या व्यक्तीला रोखले आणि मोठा अनर्थ टळला. या व्यक्तीला सध्या दिल्ली पोलिसांच्या विशेष तुकडीच्या स्वाधीन करण्यात आले आहे. हा इसम आपल्या शरीरामध्ये चीप असल्याचं सांगत होता.

# आरोपांचा कलगीतुरा सुरुच

*राज्यातील सत्ताधारी शिवसेना आणि विरोधी पक्ष भाजप यांच्यातील आरोपांचा कलगीतुरा बुधवारीही अखंडित राहिला. खा.संजय राऊत यांनी केलेल्या आरोपांना भाजप नेते किरीट सोमय्या यांनी थेट दिल्लीतून प्रत्युत्तर दिले. तर या वादात आता केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनीही उडी घेत शिवसेनेवर निशाणा साधला. या आरोप, प्रत्यारोपांमुळे महाराष्ट्राचे डोके मात्र गरगरायला लागले.*

## सोमय्यांचे राऊतांना आव्हान

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भाजप, शिवसेनेतील आरोपांचा सिलसिला सुरुच असून, भाजप नेते किरीट सोमय्यांनी बुधवारी नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत शिवसेना खा. संजय राऊत, रश्मी ठाकरे यांच्यावर टीका केली.

कोर्लई येथे ज्या १९ बंगल्यांचा टॅक्स रश्मी ठाकरे भरतायत, तेच चोरी कसे गेले, असा सवाल केला सोमय्यांनी केला आहे. राऊत्यांच्या वक्तव्याने महाराष्ट्राचं डोकं गरगरलंय, हे सांगायलाही सोमय्या विसरले नाहीत.



भाजप नेते किरीट सोमय्या म्हणाले की, घर नाही तर घरपट्टी का भरतात. याचं उत्तर मुख्यमंत्र्यांनी द्यायचंय. मुख्यमंत्री झाल्यानंतर घरपट्टी भरलीय. त्याचं ५.४२ लाख असं ग्रामपंचायतीने व्हॅल्युएशन दाखवलंय. २००८ मध्ये व्हिजीट करून घरं बांधून झाली. तुम्ही ॲग्रीमेन्ट २०१४ मध्ये केलं. मुख्यमंत्र्यांनी १२ नोव्हें २०२० ला प्रॉपर्टी टॅक्स पान २ वर

> माझ्याकडे देखील राऊतांची संपूर्ण कुंडलीच आहे. ती मी कधीही बाहेर काढू शकतो हे राऊतांनी लक्षात ठेवावे. राऊत हे काहीही पुरावा नसताना आरोप करत आहेत.
> – नारायण राणे, केंद्रीय मंत्री

## कोर्लईत 'ते' बंगलेच नाहीत




। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या पत्नी रश्मी ठाकरे, मनिषा वायकर यांच्या मालकीचे १९ बंगलेच नसल्याचा लेखी खुलासा कोर्लईचे सरपंच प्रशांत मिसाळ यांनी केला आहे.

भाजप नेते किरीट सोमय्यांनी यासंदर्भात केलेल्या आरोपानुसार मुरुड कोर्लई येथील रश्मी ठाकरे, मनिषा वायकर यांच्या नावे साडे नऊ एकर जमीन आहे. या जमिनीवर १९ बंगले असल्याचा आरोप भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी केला होता. प्रत्यक्षात या जागेची पाहणी केली. पान २ वर

## उसर गेल कंपनी प्रकल्पग्रस्तांवर हल्ला

### अकरा जणांवर गुन्हा दाखल

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

उसर गेल कंपनी प्रकल्पग्रस्त आंदोलकांवर हल्ला केल्या प्रकरणी रेवदंडा पोलीस ठाणे येथे फिर्यादीनुसार अकरा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कुणे येथील महिला फिर्यादीचे पती व गावातील ग्रामस्थ प्रकल्पग्रस्त असून विविध मागणीसाठी गेल कंपनी गेट जवळ १४ फेब्रुवारीपासून आंदोलनासाठी बसले आहेत. प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांना खानावमधील अकरा जणांचा विरोध आहे, महिला फिर्यादी व साक्षीदार हे सकाळी पायी चालत भेरसे येथे मोलमजुरीचे कामासाठी जात असताना, खानाव येथील सहा जणांनी गेल कंपनीत नोकरीच्या कामावरून असलेल्या वादातून मनात राग धरून रस्ताने जात असलेल्या महिला फिर्यादी व साक्षीदार यांचा रस्ता आडवून त्यांना पुढे जाण्याचा अटकाव केला तसेच शिवीगाळ व दमदाटी करून लाकडी बांबूच्या काठीने मारहाण केली. तसेच यामधील आरोपी एक यांनी साक्षीदार यांचे गळ्यातील सोन्याचे अर्धा तोळयाची चेन काढून घेतली.

सदर झालेला प्रकार फिर्यादी व साक्षीदार यांना सांगितला, यावेळी तेथे एकूण पान २ वर

## शिवानी जंगम स्वीकृत नगरसेविका

। खोपोली । वार्ताहर ।

खालापूर नगरपंचायतीच्या स्वीकृत नगराध्यक्षा पदावर शेतकरी कामगार पक्षाकडून माजी नगराध्यक्षा शिवानी संतोष जंगम तर सेनेकडून सुप्रिया सुनील साळुंखे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.



बुधवारी खालापर नगरपंचायत स्वीकृत नगरसेवकपदाची निवडणूक जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने घेण्यात आली. सतरा नगरसेवक असलेला नगरपंचायती शिवसेनेचे आठ शेतकरी कामगार पक्षाचे सात आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन नगरसेवक असे संख्याबळ आहे. दोन स्वीकृत नगरसेवक पदासाठी शेकापकडून शिवानी जंगम आणि शिवसेनेच्या सुप्रिया साळुंखे ह्याने अर्ज भरला. दोघींची निवड बिनविरोध झाली आहे. शेकापकडून शिवानी जंगम यांचे नाव ठरले होते तर शिवसेनेत आठ ते दहाजण इच्छुक होते. परंतु सुप्रिया साळुंखे यांनी बाजी मारली. त्यामुळे स्वीकृत नगरसेवकाच्या शर्यतीत असलेले माजी सभापती आणि माजी स्वीकृत नगरसेवक उमेश गावंड आणि राष्ट्रवादीचे वैभव भोईर यांच्या नावांना पूर्णविराम मिळाला आहे.

## अपघातात कंटेनर चालकाचा मृत्यू

। खोपोली । वार्ताहर ।

हुतामाकी कंपनीतून माल खाली करून बाहेर जाणाऱ्या कंटेनर चालकाचा विचित्र अपघातात मृत्यू झाला.ही घटना बुधवारी कंपनी गेटजवळ घडली.

वाहनाची तपासणीसाठी कंटेनर चालू स्थितीत ठेऊन चालक खाली उतरला होता. तो तसाच गाडीच्या मागे जात कंटेनरचे दार उघडून वॉचमनला तपासणीसाठी दाखवित असताना अचानकपणे गाडी पुढे जावू लागली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पान २ वर

## क्लिक खंडोबाच्या नावानं चांगभलं



■ माघ पौर्णिमेनिमित्त अलिबाग कोळीवाड्यातून काढण्यात आलेली खंडोबा देवाची 'श्री पालखी'

# योजनांकडे लोकचळवळ म्हणून बघा -सीईओ

### पाणी व स्वच्छता विभागातर्फे प्रशिक्षण शिबिर

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

ग्रामपंचायतींनी सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन याकडे शासकीय योजना न पाहिल्यास लोकचळवळ म्हणून पाहिल्यास प्रत्येक ग्रामपंचायत आदर्श व स्वच्छ, सुंदर होईल असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी बुधवारी (दि. १६) पाणी व स्वच्छता विभाग आयोजित



ऑनलाइन प्रशिक्षण शिबिरात केले. तसेच ग्रामीण विकासाचा पाया महिला बचत गट असून, सरपंच, ग्रामसेवक यांच्यासोबत बचत गटातील महिलांनी सक्रीय सहभाग घेतल्यास ही चळवळ यशस्वी होईल, पान २ वर

#### दर्जेदार कामांची गरज -फणसे

*घरगुती कचरा व्यवस्थापनाबरोबर सार्वजनिक स्तरावरील कचरा व्यवस्थापन अत्यंत गरजेचे आहे. गावपातळीवरील सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाची कामे घेण्यासाठी जागा निश्‍चिती बरोबरच गुणवत्तापूर्ण व दर्जेदार कामासाठी दक्षता घ्यावी व येत्या महिना अखेरीस कामे पूर्ण करावीत, असे पाणी व स्वच्छता विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ज्ञानदा फणसे यांनी सांगितले.*

### रशियन सैन्य माघारी

**मॉस्को :** युक्रेनच्या सीमेनजीक असलेल्या रशियाच्या लष्करी छावण्यांतील सैनिकांच्या काही तुकड्या सराव संपल्यानंतर माघारी परतल्याचे रशियाच्या संरक्षण खात्याने जाहीर केले. यामुळे युक्रेन सीमेवरील तणाव कमी होण्याची आशा आहे. मात्र, 'नाटो'ने अद्याप प्रत्यक्षात परिस्थितीत सुधारणा दिसत नसल्याचे नमूद करत सावध पवित्रा घेतला. रशियाने १,३०,००० सैनिक युक्रेन सीमेनजीक तैनात केले आहेत, रशियाचे सैनिक युक्रेनवर कोणत्याही क्षणी हल्ला करू शकतील, असा इशारा अमेरिका आणि ब्रिटनने दिला होता.

### तरुणीचा विनयभंग

। महाड । प्रतिनिधी ।

महाड तालुक्यातील बिरवाडीमध्ये आलेल्या एका विद्यार्थिनीचा विनयभंग केल्या प्रकरणी तीन तरुणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाड एमआयडीसीमध्ये गुन्हा नोदविण्यांत आल्यानंतर तिघांना अटक करण्यांत आले आहे. रोशन विठ्ठल जाधव, तुषार धोंडीराम जाधव, अक्षय जयराम उतेकर अशी त्यांची नावे आहेत. या घटनेमुळे संताप व्यक्त केला जात आहे.







पान १ वरून

## भुवनेश्वर मंदिरात चांदीचा मुखवटा चोरीस

आले असता त्यांना मंदिराचा एक दरवाजा उघडाच असल्याचे दिसून आले. मंदिरात प्रवेश करताच दरवाजाचे टाळे तुटलेल्या अवस्थेत बाजूला ठेवण्यात आलेले दिसले. त्याच वेळी त्यांना शिवलिंगावर असलेला चांदीचा मुखवटा गायब असल्याचे दिसले. त्यामुळे मंदिरात दरोडा पडल्याचे लक्षात येताच त्यांनी पोयनाड पोलिसांशी संपर्क साधला. चोरीची घटना कळताच पोलीस निरीक्षक राहुल अतीग्रे हे आपल्या सहकार्यां सोबत घटनास्थळी हजर झाले. संपूर्ण परिसराचा त्यांनी तपास सुरू केला आहे. सीसीटिव्ही फुटेज तसेच श्वान पथकास पाचारण करून चोरट्यांचा तपास केला जात आहे. याप्रकरणी पोयनाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## उसर गेल कंपनी प्रकल्पग्रस्तांवर हल्ला

अकरा जण बेकायदेशीरपणे एकत्रीत येवून यामधील क्रमांक एक यांनी आणलेला मसाला फिर्यादी व गेटजवळ असलेले साक्षीदार यांच्या डोळयात उडवला व लोखंडी सळीने हातावर व पायार मारहाण करून दुखापती केल्या. तसेच यामधील आरोपींनी हातातील लाकडी काठीच्या बांबूने तसेच हाताबुक्काने फिर्यादी यांच पती व साक्षीदार मारहाण करून शिवीगाळ व दमदाटी केली. याबाबत रेवदंडा पोलिस ठाणे येथे अकरा जणाचे विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला असून अधिक तपास रेवदंडा पोलिस ठाण्याचे सहा.फौजदार पडवळ हे पो.नि. अशोक थोरात यांचे मार्गदर्शनाखाली करत आहेत.

## कोर्लईत ‘ते’ बंगलेच नाहीत

असता या जागेवर बंगले नसल्याचं समोर आलं. या जागेत नारळीची झाडे, गुरांचा गोठा, पंप शेड, विहीर ,पाण्याच्या टाक्या, साठवण तलाव असल्याचे दिसून येत आहे. यासंदर्भात रश्मी ठाकरे यांनी कोणत्याही प्रकारचा माफीनामा मागितला नसल्याचे कोर्लई सरपंच प्रशांत मिसाळ यांनी स्पष्ट केलं आहे. अन्वय नाईक यांनी २००९ रोजी आमच्याकडे रिसॉर्ट बांधण्यासाठी परवानगी मागितली होती. २००९ रोजी कच्ची घरे बांधली मात्र, नंतर त्यांना रिसॉर्टची परवानगी मिळाली नाही. त्या जागेवर असलेली ११-१२ घरे होती ती तोडून तेथे झाडे लावली. झाडे लावल्यानंतर २०१४ ला त्यांनी ही जागा रश्मी ठाकरे आणि मनिषा वायकर यांना रितसर विक्री केली. असंही कोर्लई गावाचे सरपंच प्रशांत मिसाळ यांनी म्हटलं

## सोमय्यांचे राऊतांना आव्हान

भरल्यानंतर ती घरं चोरीला गेली का, असा सवाल त्यांनी केलाय. शिवाय मी १२ महिन्यांपूर्वीच घरं चोरीला गेल्याची तक्रार केली. मग आता घरं नाहीत, अशी नाटकं का करता. ठाकरेंच्या पत्नीनं, रवींद्र वायकरांनी, घोस्ट घरं दाखवून कोट्यवधी लाटले असा आरोपही सोमय्यांनी केला.

## अपघातात कंटेनर चालकाचा मृत्यू

कंटेनर चालकाने तश्याच परिस्थितीत गाडी सावरण्यासाठी पुढे जाण्याचा प्रयत्न केला मात्र तो गाडी आणि गेट यामध्ये सापडल्याने त्याचा चिरडून जागीच मृत्यू झाला. महमद सलमान रईस खान, (वय-२३ वर्षे, ) उत्तरप्रदेश असे या मृत वाहनचालकाचे नावं आहे.या प्रकरणी खालापूर पोलिसात अपघाताची नोंद करण्यात आली आहे.

## लोकचळवळ म्हणून बघा -सीईओ

असा आशावादही त्यांनी व्यक्त केला. जिल्ह्यातील सर्व गट विकास अधिकारी, उप अभियंता, सरपंच व ग्रामसेवक, बचत गटातील महिला, गट समन्वयक, ठेकेदार यांचे दूरस्थ प्रणालीद्वारे प्रशिक्षण शिबिर बुधवारी पार पडले. यावेळी डॉ. किरण पाटील यांनी मार्गदर्शन केले. रायगड जिल्ह्यात स्वच्छ भारत अभियान अंतर्गत विविध कामे सुरु आहेत. सर्व कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना डॉ. किरण पाटील यांनी यावेळी दिल्या.

प्लास्टिक मुळे पक्षी व मासे मृत होतात प्रगती, उन्नती व विकास घडवायचा असेल तर प्लास्टिक बॉटल ऐवजी स्टीलची बॉटल वापरावी. कचरा वर्गीकरणासाठी त्रीकुंडीची पद्धत म्हणजे ओला कचरा, सुका कचरा व वेगळी प्लास्टिक रद्दी यासाठी तीन कचरा कुंड्या वापरल्यास निसर्गात जाणारा प्लास्टिक कचरा कमी होऊन पर्यावरणाचे संवर्धन होईल असे सागर मित्र संस्थेचे सह अध्यक्ष विनोद बोधनकर यांनी सांगितले. यावेळी शिवाजी बार्शी, गणेश खातू, गणेश मोरे यांनी प्रकल्प अंमल बजावणी बावत सविस्तर माहिती दिली. जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक जयवंत गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. संवाद तज्ञ सुरेश पाटील यानी आभार मानले. या प्रशिक्षण शिबिरात सुमारे ३ हजार जण सहभागी झाले होते.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे ढाक, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णानाची जमीन मिळकत तिचे मालक दयानंद देविदास पाटील यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे.

| स.नं. | हि.नं. | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| १२ | ७ | ०-५३-० पैकी ०-२०-० | ०=४४ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १६-०२-२०२२

**ॲड. महेश मोतीराम घारे**
**मु. सांगवी, ता. कर्जत, जि.रायगड**
**मो. ९८८१८५८६५४**
**९२७१८६९२०२**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे -

**मौजे नागशेत, ता. सुधागड, जि. रायगड. येथील जमीन मिळकत**
**मिळकतीचे वर्णन**

| जमिन मालकाची नावे | गट/स.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १. श्री. सुर्यकांत खिमजी गडा<br>२. भास्कर काशिनाथ पाटील | ३४९ | १-२३-०० | ०-२३ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरुन आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करुन आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- १७-०२-२०२२
खरेदी घेणार- श्री. प्रवीण नामदेव कोळी
रा.घर नं. २८८, शांती निवास, कोळीवाडा बेलापूर गाव,
शिमग्या गणा पाटील मार्ग, सेक्टर- २०, सीबीडी
बेलापूर, नवी मुंबई, ठाणे. ४०० ६१५
मो. ९९३०२०१३३३

**सही/-**
**खरेदीदारांचे लेखक**
**श्री. सरदारमल जोरावरमल राठोड स्टॅम्प व्हेंडर,**
**६९९ जमना निवास,पाली ता. सुधागड, जि.रायगड**
**मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०**

# खालापूर – विषय समित्यांची एकमताने निवड

## शिवसेना दोन, शेकाप, राष्ट्रवादीकडे प्रत्येकी १ समिती



**। खोपोली । वार्ताहर ।**

खालापूर नगरपंचायतीच्या विषय समित्यांची निवड एकमताने करण्यात आली. एकूण चार समित्यांपैकी शिवसेनेकडे २ तर शेकाप, राष्ट्रवादीकडे प्रत्येकी १ समितीचे सभापतीपद मिळाले आहे.

**बांधकाम सभापती -** सुनिता पाटील (शिवसेना), **पाणी पुरवठा सभापती** - किशोर पवार (शिवसेना), **महिला बालकल्याण सभापती-** प्रणिता कदम (शेकाप) - **उपसभापती** उज्ज्वला निधी (शिवसेना) यांची निवड करण्यात आली.

निवडणुकीची प्रक्रीया निवडणुक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी - कर्जत अजित नैराळे व सहाय्यक म्हणून मुख्याधिकारी खालापूर नगरपंचायत रश्मी चव्हाण यांनी काम पाहिले.

यावेळी याप्रसंगी शिवसेनेचे उमेश गावंड, पद्माकर पाटील, रोहित विचारे, अमोल जाधव, चंद्रकांत फावडे, हरिष मोडवे, नितीन पाटील, अवधूत भुर्के, पुंडलिक लोते, दिपक लोते, मयूरेश निधी, दिपक पाटील, राष्ट्रवादीचे सरचिटणीस वैभव भोईर, शहर अध्यक्ष संतोष गुरव, दिपक बोदार्डे, रोशन खराळ, किशोर म्हात्रे, शेकापचे नगरसेवक संतोष जंगम, नागेश मेडेकर, तुषार म्हात्रे, राहूल चव्हाण, विशाल उशिरे, पांडुरंग मगर, योगेश मेडेकर, प्रथमेश भोईर आदी प्रमुखासह सर्व नगरसेवक व नगरसेविका उपस्थित होत्या.

# पोलादपूर स्विकृत सदस्यपदी सुरेश पवार, संतोष चव्हाण


सुरेश पवार संतोष चव्हाण

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

पोलादपूर नगरपंचायतीच्या दुसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया स्विकृत सदस्य पदांच्या निवडीने पूर्णत्वास गेली असून शिवसेनेकडून शहरप्रमुख सुरेश पवार तर काँग्रेसकडून संतोष चव्हाण यांची निवड करण्यात आली आहे.

स्विकृत सदस्यपदी निवड झालेल्या दोन्ही नवनिर्वाचित नगरसेवकांना पोलादपूर नगरपंचायत हद्दीतील सर्व १७ प्रभागांतील समस्या मांडण्याचा आणि सोडविण्याचा अधिकार असून शहरप्रमुख सुरेश पवार यांच्याप्रमाणेच संतोष चव्हाण यांच्या निवडीनंतर विशेष समाधान व्यक्त होत आहे.

# माणगाव विषय समितींची बिनविरोध निवड

**। माणगाव । वार्ताहर।**

माणगाव नगरपंचायत विषय समिती सभापतींची निवड जाहीर करण्यात आली असून, नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, उपनगराध्यक्ष सचिन बोंबले, नगरसेवक राजेश मेहता, नगरसेवक अजित तारलेकर, नगरसेविका शर्मिला सुर्वे विषय समित्यांचे सभापतीपदी विराजमान झालेले आहेत. तर राष्ट्रवादीचे बाबुराव निंबाळकर व शिवसेनेचे हेमंत शेट यांची स्वीकृत नगरसेवकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

नगरपंचायतीच्या एकूण पाच विषय समित्यांमध्ये शिवसेनेच्या ४ नगरसेवकांना तर भाजपच्या १ नगरसेवकाला सभापती पदाची संधी मिळाली आहे. **स्थायी -** ज्ञानदेव पवार सभापती, सदस्य सचिन बोंबले, अजित तारलेकर, राजेश मेहता, शर्मिला सुर्वे. **बांधकाम-** सचिन बोंबले उपाध्यक्ष तथा पदसिद्ध सभापती, सदस्य हेमंत शेठ, नंदिनी बामुगडे, आनंद यादव, सुशीला वाढवळ. **पाणीपुरवठा -** राजेश मेहता सभापती, सदस्य कपिल गायकवाड, प्रशांत साबळे, ममता थोरे, हर्षदा सोंडकर. **स्वच्छता आरोग्य** अजित तारलेकर सभापती, सदस्य प्रशांत साबळे, कपिल गायकवाड, रिया उभारे, सुविधा खैरे. **महिला, बालकल्याण-** शर्मिला सुर्वे सभापती, सदस्य नंदिनी बामुगडे, दिनेश रातवडकर, रश्मी मुंढे, लक्ष्मी जाधव यांची निवड झाली असून या सर्वांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

**अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१७ फेब्रुवारी**

१) श्रीम. सुवर्णा क्रमवंत
अलिबाग
१७-०२-१९५५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक श्री. शरद गोपाळ गोगटे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकतीचे तपशीलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे- कोंढाणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| १९ | ६ | १-२६-०० | ०-५२ |

वर नमूद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :- १७-०२-२०२२

**ॲड. तुषार रामचंद्र भवारे**
००२, श्रावणधारा को.ऑप.हौ.सो.
ब्राह्मणआळी, नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८५०८००८१३

ने.ता.१८-०२-२०२२
अर्जदारांतर्फे वकील - श्री. अमित म. देशमुख
दि. चौकशी अर्ज नं. १३७/२०२१
नि. १४/ड

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात**

श्रीम. प्रिती प्रशांत ठाकूर ... अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही ... सामनेवाला

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळवण्यात येते की, या अर्जातील अर्जदार हे कै. प्रशांत जगजीवन ठाकूर यांचे वारस आहेत. कै. प्रशांत जगजीवन ठाकूर हे दि. ०७-०७-२०२१ रोजी अलिबाग येथे विना मृत्युपत्र मयत झाले आहेत. अर्जदार यांचेखेरीज मयत कै. प्रशांत जगजीवन ठाकूर यांना कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार नं. १ ही कै. प्रशांत जगजीवन ठाकूर यांची पत्नी आहे तर अर्जदार नं. २ ही त्यांची मुलगी आहे. मृत्युसमयी अर्जदार नं. १ व कै. प्रशांत जगजीवन ठाकूर यांचे सामाईक मालकीची मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील स.नं.४५ हि.नं. १ क/१ व स.नं. ४५ हि.नं. १ डी/१ या मिळकतीवरील नियोजित बालाजी पाल्मस या इमारतीमधील एफ विंग मधील दुसऱ्या मजल्यावरील सदनिका क्र. २०४ क्षेत्र ४६.१६ चौ.मी. ही मिळकत होती तर बँक ऑफ इंडिया शाखा नागांवकडे असलेले सोन्याचा हार (ढोबळ वजन १५.३०० ग्रॅम व नेट वजन १३.००० ग्रॅम) व सोन्याची एक बांगडी (ब्रेसलेट) (ढोबळ वजन १६.३०० ग्रॅम तर नेट वजन १३.६०० ग्रॅम) या वस्तू गहाण ठेवून कर्ज घेतलेले होते. परंतु सदर कर्ज अर्जदार नं. १ यांनी परतफेड करुनही बँकेने वारस दाखला नसल्याने दागिने परत केले नाहीत. तसेच सदनिकेमधील कै. प्रशांत जगजीवन ठाकूर यांचे अविभक्त अर्धा हिश्याबाबत वारस दाखला मिळणे आवश्यक असल्याने अर्जदार हेच कै. प्रशांत जगजीवन ठाकूर यांचे कायदेशीर वारस असलेबद्दल वारस दाखला (हेअरशीप सर्टिफिकेट) मिळावा म्हणून अर्जदाराने मे. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदाराचे मागण्यांप्रमाणे अर्जदार यांना कै. प्रशांत जगजीवन ठाकूर यांचे वारस या नात्याने वारस दाखला देण्यास कोणत्याही व्यक्तीची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत किंवा दि. १८-०२-२०२२ पर्यंत स्वतः किंवा त्यांचे वकिलांमार्फत हजर राहून आपली हरकत कळवावी.

वर नमूद केलेल्या मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदारांस त्यांचे मागणीप्रमाणे कै. प्रशांत जगजीवन ठाकूर यांचे अर्जदार हे वारस म्हणून वारस दाखला (हेअरशीप सर्टिफिकेट) देण्यास कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यात येवून मे. कोर्ट आवश्यक तो वारस दाखला देण्याचा हुकूम अर्जदाराचे लाभात करेल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दि. १४-०२-२०२२ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**सही/-**
**(लिपीक)**
**दिवाणी न्यायालय व स्तर**
**अलिबाग**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**(अधीक्षक)**
**दिवाणी न्यायालय व स्तर**
**अलिबाग**

# तळा विषय समिती सभापती निवडी



**। तळा । वार्ताहर ।**

तळा नगरपंचायतीच्या स्थायी समितीच्या सभापतींची निवड जाहीर करण्यात आली.

त्यामध्ये स्थायी समितीच्या अध्यक्षपदी नगराध्यक्षा अस्मिता चंद्रकांत भोरावकर, सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता व शिक्षण सभापतीपदी सौ.अर्चना विजय तांबे, महिला, बालकल्याण क्रीडा व सांस्कृतिक सभापतीपदी कुमारी यामिनी जनार्दन मेहत्तर, सार्वजनिक बांधकाम व दिवाबत्ती सभापतीपदी उपनगराध्यक्ष चंद्रकांत महादेव रोडे, पाणीपुरवठा व जल निःसारण सभापतीपदी गटनेते मंगेश रामचंद्र शिगवण, पर्यटन विकास व नियोजन सभापतीपदी अविनाश रविंद्र पिसाळ यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

तसेच स्विकृत नगरसेवक पदी राष्ट्रवादी कडून प्रकाश गायकवाड तर शिवसेनेकडून भास्कर गोळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवड झालेल्या सर्व सभापती व स्विकृत नगरसेवकांचे पीठासीन अधिकारी विठ्ठल इनामदार व दयानंद गोरे यांनी अभिनंदन केले. याप्रसंगी शिवसेना, भाजप व राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व नगरसेवक व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# नवनिर्वाचित नगराध्यक्षा, नगरसेवकांचा सत्कार



**। तळा । वार्ताहर ।**

तळा तालुका दिव्यांग(अपंग) संघटनेच्यावतीने नवनिर्वाचित नगरसेवक नगरसेविकांचा अध्यक्ष किशोर पितळे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी नगराध्यक्षा अस्मिता भोरावकर, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, नगरसेविका अर्चना तांबे, पुष्पा नागे, यामिनी म्हेतर, ग्रिष्मा बामणे, माधुरी घोलप, नगरसेवक अविनाश पिसाळ तसेच विजय तांबे, चंद्रकांत भोरावकर, आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिवसेना कार्यकर्ते राष्ट्रवादीत दाखल

**। आंबेत । वार्ताहर ।**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विकास कामांवर विश्वास ठेवत आंबेत बोढणवाडी शिवशक्ती मित्रमंडळ येथील असंख्य युवकांनी मुंबई येथे राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश केला आहे, यामुळे आंबेत परिसरात शिवसेनेला यावेळी शिवशक्ती मित्र मंडळ संस्थापक अध्यक्ष विलास बोले, गिरीश डोंगरे, परेश डोंगरे, अरुण डोंगरे व शिवशक्ती मंडळ पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E–TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:- EE/EHV (O&M )/DIVN/MHD/ Tech/Tender-31/2021-22 Dtd.17.02.2022 RFX No.7000022155** | **Sub. :-** Invitation of SRM E-Tender for providing & fixing of conical bird guards for various EHV Lines under EHV (O&M) Dn. Mahad | **Rs. up to 10,78,407/- (Including GST+ 1% Labour CESS)** |

EMD will be the 1% of the estimated i.e **Rs. 10,784/-** & tender fee will be the Rs. 500/-
Bid submission is from **17.02.2022 @ 00:00 Hrs to 23.02.2022 @ 23:59 Hrs** for above tender
for further details visit our website:- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person: -** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No. 7373101089
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**(Sanjay O.Katkar)**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn, Mahad**

**सिडको**
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

सिडको महामंडळाने नेरुळ उरण रेल्वे प्रकल्पाकरिता मौजे-जासई, ता. उरण व मौजे-गव्हाण, ता. पनवेल या गावातील जमिनी संपादित केलेल्या आहेत. सदर प्रकल्पामध्ये बाधित होणाऱ्या भुधारकांस भूखंड वाटप करणे प्रस्तावित आहे. खालील भूधारकांस आवश्यक दस्तऐवजांची पुर्तता न केल्याने भुखंड वाटप प्रलंबित आहे.

**नेरुळ उरण रेल्वे**

| अ. क्र. | पात्र खातेदाराचे नाव | गावाचे नाव | शेतजमीनखालील संपादित जमीनीचा तपशील | |
|---|---|---|---|---|
| | | | स. नं./गट नं. | ७/१२ नुसार एकुण क्षेत्र (हे आर ) |
| १ | मनोहर सीताराम देशमुख व इतर | गव्हाण | २६७/८ | ०-५५-१ |
| २ | विठ्ठल महादेव देशमुख व इतर | गव्हाण | २९०/१ | ०-१९-७ |
| | | | २८८/२ | ०-३२-४ |
| | | | २८८/३ | ०-१२-० |
| | | | ३८३/५ | ०-५८-० |
| ३ | हरिश्चंद्र नारायण देशमुख व इतर | गव्हाण | २६८/५ | ०-२०-८ |
| ४ | शेखर कृष्णाजी देशमुख व इतर | गव्हाण | २७०/१ | ०-४७-० |
| ५ | अमृत आबा घरत | जासई | १८६/३ | ०-०९-० |
| ६ | नामदेव राजराम देशमुख व इतर | गव्हाण | ३६२/५ | ०-१२-० |
| | | | २७१/११ | ०-०२-५ |
| ७ | चंद्रभागा गजानन देशमुख व इतर | गव्हाण | २७२/३क/१ | ०-०९-४ |
| ८ | चंद्रभागा गजानन देशमुख व इतर | गव्हाण | २७२/३क/२ | ०-०८-९ |
| ९ | शरद गोपाळ देशमुख व इतर | गव्हाण | ३६१/१ | ०-३३-९ |
| १० | हिराबाई काशिनाथ देशमुख व इतर | गव्हाण | २७६/३ | ०-२३-८ |
| ११ | विलास जगन्नाथ देशमुख व इतर | गव्हाण | २६७/१ अ | ०-७७-० |

उपरोक्त भुधारकांना भुखंड वाटप होणे कामी आवश्यक ते दस्तऐवज सादर करणेकामी कळविण्यात आले होते. परंतु सदर दस्तऐवज अद्यापपर्यंत संबंधित भुधारकांनी खाली नमूद केल्यापैकी काही कागदपत्रे सादर केली नाहीत.

तरी संबंधित भूधारकांस विनंती करण्यात येते की, खाली नमूद दस्तऐवजांची पूर्तता तात्काळ करावी. त्यानंतर भुखंडाचे वाटपाची कार्यवाही करण्यात येईल.

**सादर करावयाचे दस्तऐवज :-**

१. सर्व भूधारकांच्या स्वाक्षरीसह संमतीपत्र.
२. २२.५% भुखंड वाटपासाठी संबंधित भूधारकाच्या स्वाक्षरीसह अर्ज
३. ताबे पावतीच्या साक्षांकित प्रती
४. संबधित तलाठी कार्यालयाने प्रमाणित केलेला ७/१२ उतारा
५. आधारकार्ड, पॅन कार्ड, रेशनकार्ड, रहिवाशी दाखला
६. हमीपत्र (१०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर)
७. बंधपत्र (१०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर)
८. भूधारक मयत असल्यास वारस दाखला,वारसांचे प्रतिज्ञापत्र.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**
भूसंपादन विभाग, १ ला मजला, सिडको भवन,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४

**अप्पर जिल्हाधिकारी तथा**
**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/४३०/२०२१-२२

# देशात आर्थिक विषमतेत वाढ

## डॉ. भालचंद्र मुणगेकर यांचे प्रतिपादन | शिक्षण आरोग्य यावरील खर्च वाढवणे गरजेचे, पायाभूत सुविधांवर भर आवश्यक

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी**

देशासमोर आर्थिक प्रश्न गंभीर आहे. विषमता वाढत चालली आहे. रोजगार निर्मिती होत नाही. शिक्षण आरोग्याचे खासगीकरण होत चालले आहे. पण या आव्हानांना तोंड देण्यासाठी केंद्र सरकारकडे सशक्त धोरण नाही. त्यामुळे देशाची वाटचाल अराजकतेकडे सुरु आहे. हे असेच सुरु राहिले तर भारताचा पाकिस्तान व्हायला वेळ लागणार नाही असे परखड मत ज्येष्ठ विचारवंत डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी व्यक्त केले. ते अलिबाग येथे सहयोग पतसंस्थेच्या वतीने आयोजित भारताची विद्यमान अर्थव्यवस्था या विषयावर आयोजित व्याख्यानात



बोलत होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष योगेश मगर, संचालक मंडळ आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील विविध आव्हानांचा डॉ. मुणगेकरांनी उहापोह केला.

अर्थव्यवस्थेच्या प्रगतीचा वेग वाढवणे, आर्थिक विषमता कमी करणे, रोजगार निर्मितीला जास्तीत जास्त चालना देणे, शिक्षण आरोग्य यावरील खर्च वाढवणे आणि आर्थिक विकासाचे फायदे सर्वसामान्यापर्यंत पोहोचवून त्यांच्या जीवनाचा स्तर उंचावणे ही भारतीय विद्यमान अर्थव्यवस्थेसमोरील सर्वात मोठी आव्हाने आहेत. मात्र सध्या जी पावले उचलली जातात त्याच्यातून हे उद्दिष्ट साध्य होणार नाहीत, असे त्यांनी सांगितले.

शेतीकडे दुर्लक्ष झाले आहे. तीन लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेती आणि शेतीपूरक उद्योगांना चालना देण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. त्याचबरोबर लघु आणि सुक्ष्म उद्योगांमधून रोजगार निर्मिती होते. यातून देशाला उत्पन्न मिळते, निर्यात वाढते त्यामुळे अशा उद्योगांना चालना द्यायला हवी. पायाभूत सुविधांच्या विकासावर भर द्यायला हवा, या वर्षीच्या अर्थसंकल्पात तसा प्रयत्न केला असला तरी ३४ टक्के वाढ झाल्याचा सरकार करतंय त्यात तथ्य नाही. शिक्षण धोरण हे गरीबांपर्यंत शिक्षण कसे पोहोचले पाहिजे. आरोग्याचे धोरणही समाजातील शेवटच्या घटकांना लाभ मिळाला पाहिजे. त्यासाठी कररचनेत बदल आवश्यक आहे. राष्ट्रीय उत्पन्नाच्या १० टक्के उत्पन्न हे करातून येत आहे. सात वर्षात सरकारने यामध्ये कोणताही बदल केलेला नाही. देशातील आर्थिक विषमता लक्षात घेतली तर श्रीमंतांवर कर लावला पाहिजे. उच्चभ्रू घटकावर करवाढ केल्याशिवाय आर्थिक विकासासाठी निधी उपलब्ध होणार नाही, असा सल्ला यावेळी त्यांनी दिला.

### *हिजाबवरून भाजपाचे हिणकस राजकारण*

*हिजाबवरून भाजपा हिणकस करत आहे. यातून विद्यार्थ्यांमध्ये, हिंदू-मुस्लिम समाजात दरी निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो आहे. उडपीच्या सरकारी शाळेत एक मुलगी हिजाब घालण्याची मागणी करते. त्यावर तेथील सरकार हिजाबविरोधी कायदा करते, तीन दिवस राज्यातील सर्व शाळा यासाठी बंद ठेवल्या जातात. देशात सामाजिक तेढ निर्माण करण्याचा पद्धतशीर प्रयत्न होतो आणि यावर पंतप्रधान मोदी यात हस्तक्षेप करत नाहीत. धर्माच्या आणि जातीच्या अधारे केलेले राजकारण भाजपला पुन्हा कदाचित सत्तेपर्यंत नेईल, पण यातून देश अस्थिरतेकडे आणि अराजकतेकडे जाईल. हिजाब घालावा अथवा न घालावा हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे. हिजाब न घालण्यासाठी जर मुस्लिम समाजातील मुली पुढे आल्या तर मी त्यांचे समर्थनच करीन. पण यावरून धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करणे चुकीचे असल्याचे, त्यांनी यावेळी स्पष्ट केले.*

## वाईन पडली महागात

**। पनवेल । वार्ताहर ।**

ऑनलाईन ऑर्डर केलेली एक वाईनची बाटली महिलेला तब्बल ६५ हजार ११९ रुपयांना पडली आहे. खारघर सेक्टर ५ येथील राहणाऱ्या महिलेने गुगल वरून पायना वाईन्स नावाच्या शॉपमधून १ हजार ४०० रुपयांची एक वाईन ऑर्डर केली होती. यावेळी त्यांना समोरील व्यक्तीने व्हाट्सअप वर क्यू आर कोड पाठवला. त्याद्वारे त्यांनी चौदाशे रुपये त्याला पाठवले. अर्ध्या तासात ऑर्डर घरी डिलिव्हरी होईल असे सांगण्यात आले. समोरील क्रमांकावरून त्यांना व्हाट्सअप कॉल आला आणि गुगल प्ले वर रजिस्टर करायचे असल्याचे सांगितले. त्यावेळी अठरा हजार ३७३ रुपये त्यांच्या खात्यातून वजा झाले त्यानंतर बोलण्यात गुंतवून पैसे आले नसल्याचे सांगून एकूण ६५ हजार ११९ रुपये महिलेच्या खात्यातून वजा झाले.

---

**म ह त्वा चे**

## महाविद्यालयाचा निकाल जाहीर

**धाटाव :** रोहा तालुक्यातील एम.बी.मोरे फाऊंडेशन संचालित कला, वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय धाटाव येथील शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मधील पाचव्या सत्राच्या विद्यापीठाच्या परिक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आल्या.दरम्यान झालेल्या परीक्षेत महाविद्यालयातील तीनही शाखेचा १०० निकाल टक्के लागला आहे. कला शाखेत प्रथम क्रमांक सिमा वाकळे, द्वितीय ईशा जोंधळे या विद्यार्थिनीने पटकाविला आहे. वाणिज्य शाखेमध्ये सुतार सानिका या विद्यार्थिनी प्रथम तर वैष्णवी बसवत हिने व्दितीय आली. विज्ञान शाखेच्या रसायनशास्त्र विभागात फरहिन धनसे प्रथम तर निवेदिता दाबाडे द्वितीय आली.

## पुलावरून दुचाकी पडून अंत

**पनवेल :** रस्ते अपघात अनेकांच्या जिव्हारी लागत असल्याच्या दुर्दैवी घटना सातत्याने घडत असतानाच पनवेल माथेरान मार्गावर झालेल्या अपघातात एका २४ वर्षीय युवकाने आपला जीव गमावलाय. चिपळे पुलाजवळील खड्ड्यात दुचाकी कोसळल्याने विहिघर, महालक्ष्मी येथील ओमकार पोपट मस्के या दुचाकीस्वाराचा करुण अंत झाला. या अपघातात ओंकारसोबत असलेला आकाश सुनील तुराई हा १९ वर्षीय युवक जखमी झाला आहे.

## वृद्ध इसमाची फसवणूक

**पनवेल :** चॅरिटीला दान देताना ओटीपी नंबर नसल्याने एका मोबाईलवर फोन केला असता ६९ वर्षे इसमाची फसवणूक केल्याचा प्रकार खारघरमध्ये उघडकीस आला आहे. खारघर सेक्टर २० येथील संन्यासी राव वडाली यांना तिला दान करायचे होते त्यांच्या मोबाईलवर ओटीपी नंबर नसल्याने त्यांनी गूगल पे मधून एक नंबर मिळवला यावेळी फोन केला असता समोरील इसमाने तो स्टेट बँक इंडिया या बँकेत काम करणारे कर्मचारी असून दीपक कुमार शर्मा असे नाव सांगितले.

---

## ‘नव्या पिढीने वाजेकर शेठ यांच्या कार्याची प्रेरणा घ्यावी’

**। उरण । वार्ताहर ।**

सहकार चळवळ, कामगार संघटना, शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काची जाणीव, आगरी समाजाचे संघटन, स्वधर्माबद्दल प्रेम आणि विविध चळवळीद्वारे समाजप्रबोधन करून वाजेकर शेठ यांनी समाजात आगळे-वेगळे स्थान निर्माण केले आहे.त यांचे कार्य या पुढील पिढीसाठी ही प्रेरणादायी असेल असे प्रतिपादन आमदार बाळाराम पाटील यांनी केले. तसेच या परिसरातील विकासाचे वाटेकरी आपणास व्हायचे असेल तर आपल्याला दर्जेदार आवश्यक शिक्षण उपलब्ध करावे लागेल व त्यासाठी परिसरातील सर्व स्तरातील मान्यवरांनी मतभेद विसरून एकत्र यावे लागेल व आपण गुणवत्ता धारक नवीन पिढी




घडवूया असे विचार मांडले.

रयत शिक्षण संस्थेचे तु. ह. वाजेकर विद्यालय आणि कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय फुंडे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वाजेकर पुण्यतिथी आणि वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कृष्णा कडू चेअरमन फुंडे हायस्कूल, सुधीर घरत जनरल बॉडी सदस्य रयत शिक्षण संस्था सातारा, मोहन पाटील प्राचार्य तु. ह. वाजेकर विद्यालय फुंडे आदी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. पी. जी पवार यांनी प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत केले. सुधीर घरत, जनार्दन भोईर, संतोष पवार, कृष्णाजी कडू यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्याध्यक्ष डॉ. राहुल पाटील यांनी अहवाल वाचन केले. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत प्राध्यापक आणि विद्यार्थी यांचे पारितोषिक वितरण संपन्न झाले. जिमखाना प्रमुख डॉ.विलास महाले यांनी क्रीडा विभागाचे अहवाल वाचन केले. सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. सुजाता पाटील यांनी सांस्कृतिक विभाग अहवाल वाचन केले. प्रा.यू. टी.घोरपडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाला जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर, दिपक ठाकूर, जिवन गावंड, माधव बंडा, रमाकांत म्हात्रे, यशवंत ठाकूर, नितीन कमलाकार ठाकूर, मीनाक्षी म्हात्रे, सीमा घरत, गोपाळ पाटील, सदानंद गायकवाड, चंद्रशेखर म्हात्रे, उमेश म्हात्रे, दिपक तांडेल, गणेश कडू, धनंजय म्हात्रे, मनोहर पाटील, सर्व शिक्षक-शिक्षकेतर रयत सेवक,महालन विभागातील सर्व ग्रामस्थ, पत्रकार, विद्यार्थी आणि विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

---

### उरण परप्रांतीय

## भंगारमाफियांच्या विळख्यात



**। उरण । वार्ताहर ।**

**|| ओएनजीसीच्या पाईपलाईनवर थाटली दुकाने**

**|| नगरपालिका व ओएनजीसीचे दुर्लक्ष**

उरण शहर परप्रांतीय भंगार माफियांच्या विळख्यात सापडली आहे. शहरातील जनता सोयीसुविधा पासून वंचित असताना मात्र या भंगार माफियांना पाणी, वीज सुविधा पुरविल्या जात आहेत. विशेष म्हणजे या भंगार माफियांनी बोरी नाका येथील स्मशानभूमीच्या लगत असलेल्या जागेवर कब्जा केलेला आहे. त्या ठिकाणावरून ओएनजीसी गॅस पाईपलाईन गेलेली असतानाही त्यावर कोणतेही बांधकाम करण्यास सक्त मनाई असताना भंगारची दुकाने खुलेआम वसली आहेत.

येथील जनतेला नोकरीसाठी पोलीस तपासणी सक्तीची असताना परराज्यातून या ठिकाणी वास्तव्य करणारी व्यक्ती यांची कोणतीही नोंदणी अथवा पोलीस तपासणी केलेली दिसत नाही. अशा व्यक्तीकडूनच घातपात घडवला जाऊ शकतो. प्रदूषण नियमांना फासण्यात येणारी हरताळ सुरु असून सामाजिक आरोग्य आजही धोक्यात असल्याचे दिसत आहे. यासोबतच लगतच नागरी वस्ती असतानाही राजरोसपणा या भंगारवाल्यांचे कडून कारखान्यातील जमा केलेले साहित्य गॅस कटरने कापण्याचे काम करण्यात येते. या ठिकाणाहून ओएनजीसी गॅस पाईपलाईन गेलेली आहे. त्यामुळे ओएनजीसीचा या ठिकाणी कोणताही व्यवसाय अथवा बांधकाम करण्यास सक्त मनाई हुकूम असतानाही याची खुलेआम पायमल्ली करून भंगार माफियांचा विळखा पडला आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पर्यावरण सुरक्षा नियमांचे अंतर्गत नागरी वस्तीमध्ये कोणताही कचरा व अन्य वस्तू जाळू नये असे नियम आहेत. जर या नियमांचे कोणी उल्लंघन केल्यास त्यावर कारवाई करण्याचा अधिकारी स्थानिक स्वराज्य संस्थेला देण्यात आला आहे.असे असतानाही हे सर्व भंगार व्यावसायिक राजरोसपणे हे सर्व विषारी पदार्थ जाळून प्रदूषण करत आहेत. मात्र आजपर्यंत त्यांच्यावर कोणत्याही कारवाई होताना दिसत नाही.

---

### घोणसे-म्हसळा बायपास घाटांत

## १५ दिवसांत सहा अपघात

**। दिघी । वार्ताहर ।**

दिघी ते पुणे या राष्ट्रीय महामार्गावरील माणगाव-म्हसळा रस्त्यावर घोणसे, मोर्बा व म्हसळा बायपासघाटातील वळण धोकादायक ठरत आहे. या वळणावर संरक्षण कठडे व दिशादर्शक फलक बसवाव, अशी मागणी वाहन चालकांकडून होत आहे. एका फेब्रुवारी महिन्यात या घाटांत सहा अवजड वाहनांचे अपघात घडले आहेत. सुदैवाने यात कुणी मृत नाही मात्र, वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे.

संरक्षक कठडे व दिशादर्शक फलक नसल्यामुळे वाहनधारकांना वळणाचा अंदाज येत नसल्याने अपघात होण्याची भीती व्यक्त होत आहे. माणगावकडून म्हसळाकडे येण्यासाठी उतार असल्याने वाहनांचा वेग अधिक असतो. माणगावकडून येणारी वाहने वळणावर संरक्षक कठडे नसल्याने सरळ दरीत जाण्याची शक्यता आहे. या अगोदर देखील दोन्ही घाटात अनेकांना जीव गमवावा लागला आहे. वळणाचा अंदाज येत नसल्याने अनेक वाहने घाटाच्या खाली गेली आहेत. स्थानिक लोकप्रतिनिधींनी लक्ष देऊन घाटातील अपघाती वळणावर संरक्षक कठडे व दिशादर्शक फलक बसवावे अशी मागणी करण्यात आली आहे.

---

### जमाउदीम शहा बाबांच्या उरुसास

## पंडितशेठ पाटील यांची उपस्थिती

**। भाकरवड । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील सुप्रसिद्ध पोयनाड बाजारपेठेत असलेल्या जमाउदीन शहा बाबांचा उरुस १५ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न झाला.

यावेळी माजी आ. पंडितशेठ पाटील, जिल्हा परिषदेच्या सदस्या भावना पाटील,[ जिल्हा परिषदेच्या सदस्या चित्रा पाटील, जिल्हा परिषदेचे सदस्य आस्वाद पाटील, सरपंच शकुंतला काकडे, माजी सरपंच भूषण चवरकर, दिलीप काकडे, गणेश शितकंजे, कैलास भोईर, महेंद्र पाटील, अजित चवरकर, विजेन्द्र तावडे, राजू



जाधव, जनार्धन स्वामी, विद्याधर निळकर, अमरनाथ राऊत, वसंत शिंगासने, विजय पाटील, जीवन निळकर, महता आलम, अन्वर बुरान, हैदर पठाण, मनोज चाचर, आयुफ औसेकर, नसरू औसेकर, मुराद बुरान, गफार औसेकर, विठ्ठल धुमाळ, दीपक पाटील, सुबोध पाटील, शैलेश गायकवाड, आदी मुस्लिम समाजाचे व हिंदू समाजाचे मान्यवर उपस्थित होते. या संपूर्ण कार्यक्रमाची व्यवस्था व जबाबदारी दर्गा समितीचे अध्यक्ष सुभाष पाटील भाकरवड यांनी पाहिली.

---

## अफवांवर विश्वास न ठेवण्याचे सिडकोकडून आवाहन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

सिडको महामंडळातर्फे येत्या गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर नवीन गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात येणार असल्याचे काही वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेले वृत्त हे निराधार असून, अशा प्रकारच्या अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन सिडकोकडून करण्यात आले आहे. केवळ सिडकोद्वारे प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या अधिकृत माहितीवरच याबाबत नागरिकांनी विश्वास ठेवावा, असे सिडकोकडून कळविण्यात येत आहे.

सिडकोकडून नुकताच २६ जानेवारी २०२२ रोजी नव्या गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात आला. या योजनेकरिता २४ फेब्रुवारी २०२२ पर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहेत. आतापर्यंत १० हजाराहून अधिक अर्ज प्राप्त झाले आहेत. अधिकाधिक नागरिकांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन सिडकोने केले आहे. [आपल्या नव्याने येणाऱ्या गृहनिर्माण योजनांची माहिती सिडकोकडून जाहिरात व अन्य माध्यमांद्वारे अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहचविण्यात येते. यामुळे नागरिकांनी या संदर्भात सिडकोद्वारे प्रसारित करण्यात येणारी प्रसिद्धी पत्रके, सिडकोचे अधिकृत संकेतस्थळ, फेसबुक, युट्यूब आणि ट्विटरवरील सिडकोचे अधिकृत पेज यांद्वारे देण्यात येणाऱ्या माहितीवरच विश्वास ठेवावा, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आलेआहे.तसेचलवकरचवाणिज्यिक गाळ्यांच्या विक्रीची योजना जाहीर करण्यात येणार असल्याचेही सिडकोकडून कळविण्यात आले आहे.

---

## मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे कामात मनमानीपणा

### रस्ता खोदून ठेवलाय, नळ तोडल्यामुळे ग्रामस्थांची पाण्यासाठी धावपळ

**। नेरळ । वार्ताहर ।**

कर्जत तालुक्यातील जिते ग्रामपंचायतमधील बोर्ले ते कुंभे या तीन किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून केले जात आहे. या रस्त्याच्या कामासाठी जिते गावातील रस्ता खोदून ठेवला असून १५ दिवसानंतर देखील तेथे कोणतेही काम केले जात नाही. दरम्यान, त्या रस्त्याच्या खोदकामामुळे तेथील जलवाहिन्या तुटल्या असून स्थानिक ग्रामस्थांना पिण्याचे पाणी आणण्यासाठी धावपळ करावी लागत आहे. तर ठेकेदार कंपनी स्थानिक ग्रामस्थांचे काही ऐकून घेत नसल्याने त्यांची मनमानी रस्त्याचे काम सुरू झाल्यापासून डिसेंबर महिन्यापासून



सुरू आहे.

जिते ग्रामपंचायत मधील कुंभे-जिते-बोर्ले या तीन किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून मंजूर झाले होते. त्या रस्त्याचे काम डिसेंबर महिन्यात सुरू करण्यात आले. त्यावेळी बोर्ले येथील पेशवाई रस्ता खोदून ठेवला होता. तेथे पाईप मोरी टाकण्यासाठी तब्बल दीड महिना रस्ता बंद ठेवला होता. स्थानिक ग्रामस्थांनी आवाज उठविल्यावर योजनेचे अधिकारी यांच्या रेट्यामुळे रस्त्याचे काम सुरू झाले. दुसरीकडे रस्त्याचे काम करताना ठेकेदार कंपनीने जेसीबी मशीनच्या साहाय्याने खोदकाम केले. त्यावेळी जलवाहिन्या तुटल्या असून त्या जलवाहिन्यामधून दररोज हजारो लिटर पाणी रस्त्यात वाहून चालले आहे. मात्र त्यानंतर जलवाहिन्या तोडणारा ठेकेदार स्थानिक ग्रामस्थांवर अरेरावी करीत असून जलवाहिन्या १५ दिवसापासून तशाच आहेत. त्यामुळे रहिवाशांनी आपल्या नळ जोडण्या आणि रस्त्याचे काम लवकरात लवकर करावे अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

> **आमच्याकडे पाण्याच्या जलवाहिन्या यांची समस्या ग्रामस्थांनी पोहचविली असून त्या जलवाहिन्या तात्काळ दुरुस्त करून देण्याच्या सूचना ठेकेदाराला देण्यात आल्या आहेत. तर रस्त्याचे काम एवढे दिवस खोदकाम केल्यानंतर खडी टाकून ठेवले आहे, त्याबद्दल खातेनिहाय जाब विचारला जाईल.**
>
> **- राहुल चौरे, उपअभियंता मुख्यमंत्री ग्रामसडक योजना**

---

## सार्वजनिक शौचालय तोडल्याने आदिवासींची गैरसोय

*। नेरळ । वार्ताहर ।*

*कर्जत तालुक्यातील नेरळ ग्रामपंचायतीमधील आदिवासी लोकांची वस्ती असलेल्या वाल्मिकीनगर भागातील सार्वजनिक शौचालय नेरळ ग्रामपंचायतीने तोडले आहे. २० वर्षांपासून त्या ठिकाणी असलेले सार्वजनिक शौचालय तोडल्याने स्थानिक आदिवासी कातकरी समाजाच्या ग्रामस्थांची गैरसोय होत आहे. दरम्यान, स्थानिक कातकरी समाजाने याबाबत आक्रमक भूमिका घेतल्याने आता नेरळ ग्रामपंचायत पुन्हा त्या ठिकाणी नव्याने सार्वजनिक शौचालय बांधणार आहे.*




*नेरळ ग्रामपंचायतीमधील वाल्मिकीनगर भागात २० वर्षांपूर्वी दोन सीटचे सार्वजनिक शौचालय नेरळ ग्रामपंचायतीने बांधले होते. प्रामुख्याने कातकरी आदिवासी लोकांची वस्ती असलेल्या त्या भागात वस्ती वाढली आणि त्यामुळे दोन सीटचे सार्वजनिक शौचालय कमी पडू लागले. स्थानिक ग्रामस्थांची मागणी लक्षात घेऊन नेरळ ग्रामपंचायतीने १० वर्षांपूर्वी त्या ठिकाणी असलेल्या सार्वजनिक शौचालयचा विस्तार करून दोन सीटचे शौचालय चार सीटचे तयार केले. स्थानिक कातकरी समाजाचे ग्रामस्थ यांच्याकडून कल्याण-कर्जत रस्त्याच्या कडेला असलेल्या त्या सार्वजनिक शौचालयाचा वापर केला जात होता. मागील महिन्यात स्थानिक एका रहिवाशाने नेरळ ग्रामपंचायतीकडे संबंधित सार्वजनिक शौचालयामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून ते तोडण्यात यावे अशी मागणी केली. त्यामुळे स्थानिकांचा ते सार्वजनिक शौचालय तोडण्यास हरकत असल्यास ग्रामपंचायत कार्यालयास कळवावे, असा फलक नेरळ ग्रामपंचायतीने त्या सार्वजनिक शौचालयावर लावून ठेवला.*

> ***आदिवासी कातकरी समाजाची वस्ती असलेल्या त्या आदिवासी लोकांनी नेरळ ग्रामपंचायतीकडे हरकत घेतली नाही आणि ९ फेब्रुवारी रोजी नेरळ ग्रामपंचायतीने ते सार्वजनिक शौचालय तोडून टाकले. मात्र त्यानंतर अडचणी निर्माण होऊ लागल्या आणि नेहमीचे सार्वजनिक शौचालय तोडून टाकण्यात आल्याने स्थानिक ग्रामस्थ यांची गैरसोय होऊ लागली. या भागातील अनेक ग्रामस्थांना थेट कोतवालवाडी भागातील मोकळ्या जागेत हातात डब्बा घेऊन जावे लागले होते.***
>
> ***-उषा पारधी सरपंच नेरळ***

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदीनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण परिस्थितीला तोंड देऊन पोटाची खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका






नातेवाईकाला एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**सौ. कविता विलास म्हात्रे, वाढदिवसानिमित्त अलिबाग**

## संपादकीय

# डिस्को युगाचा उद्गाता

अनेक गायक-गायिकांच्या गळ्यांतही रुजतील अशी गाणी देणारा आणि न डान्सरनाही बिनधास्तपणे नाचायची सोय करणारा एक वेगळ्या धाटणीचा संगीतकार बप्पी लहिरी यांचे निधन झाले आहे. त्यांच्यामुळे भारतात डिस्को संगीत नृत्याचा जमाना रुजला आणि आज पन्नाशीत आणि साठीत असलेल्या तेव्हाच्या कॉलेजकुमार, कॉलेजकुमारिकांना पारंपारिक संगीतापेक्षा वेगळी आविष्काराची परिभाषा मिळाली. त्यांना संगीत देण्यासाठी मिळालेले सिनेमे हे 'नमक हलाल', 'घायल' आदी दोन चार अपवाद वगळले तर कधीही सर्वांत मोठे किंवा प्रतिष्ठित नव्हते. मात्र त्यांनी आपली पारंपरिक मेलडीच्या संगीतासह तेव्हाच्या नवीन युगाच्या डिस्को संगीताचा वापर करून आपली गाणी संस्मरणीय बनवली. आजही बप्पी लहिरी म्हटल्यावर त्यांचा भारी गॉगल लावलेला चेहरा आणि गळ्यात अनेक सोन्याच्या साखळ्यांनी भरलेल्या छातीची त्यांची मूर्ती डोळ्यांपुढे उभी राहते. तसेच, 'बॉंबे से आया मेरा दोस्त, दोस्त को सलाम करो' हे प्रत्येकाच्या ओठांवर रुळलेले आणि कोणीही गाऊ शकणारे गाणे आठवते. त्यांनी 'चलते चलते' या चित्रपटात किशोर कुमार यांच्याकडून गाऊन घेतलेले 'चलते चलते मेरे ये गीत याद रखना, कभी अलविदा ना कहना' हे गाणेही आज चार दशकांहून अधिक काळ उलटल्यानंतरही तितकेच आठवते. ते आजही कॉलेजच्या शेवटच्या दिवशी होणाऱ्या फेअरवेल पार्टीत गायचे किंवा निरोप समारंभात गायचे गाणे ठरलेले आहे. 'साहेब' चित्रपटातील 'यार बिना चैन कहा रे, प्यार बिना चैन कहा रे' हे गाणे तर सदाबहार गाण्यात मोजले जाते. या गाण्यासाठी त्यांनी आपला आवाजही दिला. त्यांनी अनेक गाणी गायली. स्वत: संगीतबद्ध केलेली किंवा अन्य संगीतकारांसाठी सुद्धा. त्यांची अलिकडची अशी गाजलेली गाणी म्हणजे 'टॅक्सी नंबर ९२११' मधील 'ये है बंबई नगरिया' हे गाणे आणि त्याहून सुपरहिट ठरलेले 'द डर्टी पिक्चर' मधील 'उ ला ला उ ला ला' हे गाणे. मात्र त्यांची जशी पारंपरिक गाण्यांतून ओळख झाली तशी त्यांचे वेगळेपण ठरवणारी ओळख डिस्को प्रकारच्या संगीतातून झाली. त्यांनी तसे काही डिस्को संगीतावर आधारीत सुपरहिट सिनेमे दिले. एका अर्थाने त्यांना भारतातील डिस्को संगीत युगाचा उद्गाता असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. ऐंशीच्या दशकात संगीत प्रकारात बदल घडत होते आणि ते चित्रपट क्षेत्रात आले नसते तरच नवल. डिस्को संगीत हा नवीन संगीताचा आणि नृत्याचाही प्रकार नव्या तरुणाईच्या मनाचा ठाव घेऊ लागला होता. चित्रपट क्षेत्रातही बदल घडत होते. ज्याप्रमाणे पारंपारिक मारामारी नेहमीची होऊन ब्रुस ली प्रणित कुंग फू प्रकारच्या फायटिंगमध्ये तरुणाईला रस निर्माण झाला होता. मिथुन चक्रवर्ती हा नवा नायक याच प्रकारात पारंगत होऊन, ब्लॅक बेल्ट धारक बनून पडद्यावर अवतरला होता. त्याने आपली एक नवीन नृत्यशैलीही आणली होती. ती होती डिस्कोची. त्यासाठी मिथुनचा आवाज आणि त्याच्या नृत्याला आवश्यक संगीत देणाऱ्या संगीतकाराची गरज बप्पी लहिरी यांनी पूर्ण केली. अनेक चित्रपटांत मिथुनचा आवाज बनून बप्पी गायले आणि त्याच्यासाठी संगीतही दिले. त्यातून 'डिस्को डान्सर' सारखे त्या काळचे सर्वाधिक हिट चित्रपट निर्माण झाले. 'आय एम अ डिस्को डान्सर' सारखे गाणे त्यांनी रचले आणि 'मौसम है गाने का' सारखी गाणी त्यांनी गायली. तो काळ त्यांनी आपल्या संगीताने रंगवला आणि त्यात यश मिळवून दिले. तरुणाई ज्या नवीन प्रकारच्या संगीताच्या शोधात होती, ते त्यांनी पुरवले. त्या अर्थी ते ऐंशी आणि नव्वदच्या दशकातील काळावर राज्य करीत होते. त्यांनी हिंदी बरोबरच बंगाली, तेलुगु या चित्रपटाही मोठ्या प्रमाणात संगीत दिले. शिवाय तमिळ, कन्नड, गुजराती चित्रपटांनाही दिले. परंतु त्यांची ओळख प्रामुख्याने हिंदी आणि बंगाली चित्रपटांतील संगीतामुळे झाली. त्यांनी मधुर सुरावटीच्या गाण्यांची भेट जशी दिली तशी त्यांनी ब्रेक डान्स आदी नव्या नृत्यप्रकारांसाठीही उडत्या आणि पाश्चात्य बीटच्या संगीतातूनही लोकांचे रंजन केले. कभी अलविदा ना कहना असे म्हणणाऱ्या या अनोख्या कलाकाराने आपला निरोप घेतला आहे. मात्र त्याचा संगीत खजिना सर्व रसिकांसाठी मागे ठेवला आहे. बप्पी लहिरी यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# वातावरणबदलामुळे लाखो मनुष्यतास वाया

रुपाली केळस्कर

***वातावरणातल्या बदलाचा जगावर प्रतिकूल परिणाम होत असतो, यात नवं काही नाही. हवामानबदलामुळे तसंच तापमानवाढीमुळे पिकांचं नुकसान, आर्थिक हानी तसंच पर्यावरणाचाही ऱ्हास होत असतो. यामुळे जगभरात होणाऱ्या एकूण कामाच्या तासांचं तीस टक्के नुकसान होतं. त्यामुळे पर्यावरणविषयक कारणांमुळे होणारं नुकसान लक्षात घेऊन परिस्थिती बदलण्यासाठी कार्यरत राहण्याची नितांत गरज आहे.***



वातावरणातल्या बदलामुळे एकीकडे पर्यावरणाचा ऱ्हास होऊन लोकांमध्ये आजार वाढत आहेत, तर दुसरीकडे आर्थिक नुकसानही होत आहे. नुकत्याच समोर आलेल्या एका अहवालातून हवामानातल्या सततच्या बदलामुळे प्रत्येक देशात दररोज कामाचे अनेक तास वाया जात आहेत. 'नेचर जनरल'मध्ये प्रकाशित झालेल्या अहवालानुसार, यामुळे भारतात कामाच्या १४ दिवसांचं नुकसान होतं. (कामाच्या १२ तासांच्या आधारे अंदाज). जगभरातल्या हवामानबदलामुळे ३० टक्के काम गमवावं लागलं आहे. अशीच परिस्थिती कायम राहिल्यास आगामी काळात हा फटका आणखी वाढू शकतो, असा इशारा हवामानतज्ज्ञांनी दिला आहे. सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्न्मेंटचे विवेक चट्टोपाध्याय यांच्या मते, हवामानातला बदल आणि प्रदूषणाचा उत्पादन क्षमतेवर परिणाम होतो. निरोगी नसलेल्या लोकांकडून चांगलं काम होऊ शकणार नाही. सरकारने हवेचं प्रदूषण कमी करण्यासाठी योग्य ती पावलं उचलली आणि नियंत्रण आणलं तर जीडीपीचं नुकसान कमी होऊ शकतं. ग्लोबल वॉर्मिंगच्या सद्यः स्थितीनुसार, दरवर्षी भारताचं १०० अब्ज तासांचं नुकसान होत आहे.

अहवालातल्या कामाचे तास दिवसाच्या बारा तासांच्या कामाच्या आधारावर मोजले गेले आहेत. अभ्यासात सकाळी सात ते संध्याकाळी सातपर्यंतच्या वेळेचा विचार करण्यात आला आहे. निकोलस स्कूल ऑफ द एन्व्हायर्न्मेंट, ड्यूक युनिव्हर्सिटीचे ल्यूक ए पार्सन्स यांनी म्हटलं आहे, की भारतातलं कामगार क्षेत्र खूप मोठं आहे. या प्रकरणात, त्याचं नुकसान अधिक होईल. आगामी काळात जागतिक तापमानवाढीमुळे दोन अंशांची वाढ झाली तर कामाच्या तासांचं दुप्पट नुकसान होईल. म्हणजेच, वार्षिक २०० अब्ज तास. यामुळे सुमारे एक महिन्याच्या कामकाजाचे तास वाया जातील. त्याचा थेट परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवरही होतो. सध्याच्या परिस्थितीत जागतिक तापमानवाढ ज्या वेगाने होत आहे, ते लक्षात घेऊन तापमानात चार अंश वाढीचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या स्थितीत भारताचे कामाचे ४०० अब्ज तास कमी होतील. पार्सन्स म्हणतात, की यामुळे दोन देशांमधल्या चलनाच्या क्रयशक्तीमधला फरक किंवा समानता शोधण्यासाठी भारताला २४० अब्ज डॉलरची क्रयशक्ती समता मिळते. हे चलन विनिमय दर ठरवण्यासाठी आहे. इतर देशांमध्ये हीच परिस्थिती आहे. अहवालात म्हटलं आहे की चीनमधल्या हवामानातल्या बदलामुळे वार्षिक सुमारे ७२ अब्ज तासांचं नुकसान होत आहे.

हवामानातल्या बदलामुळे कतार, बहरीन आणि सौदी अरेबियाच्या अर्थव्यवस्थेला सर्वाधिक फटका बसत आहे. १९७० ते २००५ या काळात भारतात हवामानविषयक अशा २५० अत्यंत टोकाच्या घटना घडल्या आहेत. त्यानंतरच्या १५ वर्षांमध्ये अशा ३१० घटना घडल्या. गेल्या ५० वर्षांमध्ये पूर आठपटींनी वाढले आहेत. यामुळे भूस्खलन, अतिवृष्टी, वादळ आणि ढगफुटीच्या घटनांमध्ये वीसपट वाढ झाली आहे. अहवालात म्हटलं आहे, की १९७० ते २००४ दरम्यान भारतात दरवर्षी अतिप्रचंड पुराच्या सरासरी तीन घटना घडल्या. आता दरवर्षी या घटनांचं सरासरी प्रमाण ११ झालं आहे. २००५ पर्यंत दर वर्षी १९ जिल्हे पूरग्रस्त असायचे; पण आता दर वर्षी ५५ जिल्ह्यांना पुराचा सामना करावा लागतो.

देशात एकूण ७२८ जिल्हे आहेत. गेल्या शंभर वर्षांमध्ये देशाचं तापमान ०.६ अंशांनी वाढलं आहे. त्यामुळे नैसर्गिक आपत्तींमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे भारत जगाची 'पूर राजधानी' बनू शकतो, असा इशारा या अहवालात देण्यात आला आहे. भारतात मान्सूनच्या दिवसांची संख्या कमी होत आहे; परंतु एका दिवसातल्या पावसाची सरासरी वाढत आहे. परिणामी, पुराचं प्रमाण वाढणार आहे. देशात पुरासोबतच दुष्काळाचं प्रमाणही वाढत आहे. सीईईडब्ल्यू अहवालानुसार, २००५ च्या तुलनेत दुष्काळ तेरा पटींनी वाढला आहे.

देशातल्या ६८ टक्के जिल्ह्यांना (७९ जिल्हे) दुष्काळाचा तडाखा बसला आहे. २००५ पूर्वी सरासरी फक्त सहा जिल्हे दुष्काळानं ग्रस्त होते. अहमदनगर, औरंगाबाद, अनंतपूर, चित्तूर, बागलकोट, विजापूर, चिक्कबल्लापूर, गुलबर्गा आणि हसन या जिल्ह्यांना गेल्या दशकात सर्वात भीषण दुष्काळाचा फटका बसला आहे. अहवालात असं आढळून आलं की २००५ पासून २४ जिल्ह्यांमध्ये दर वर्षी चक्रीवादळाच्या घटना घडल्या आहेत. ४.२५ कोटी लोकांना वादळ, तीव्र चक्रीवादळाचा धोका निर्माण झाला आहे.

गेल्या दशकात, चक्रीवादळांनी २५८ जिल्ह्यांना तडाखा दिला. या अहवालाचा सर्वात धक्कादायक निष्कर्ष असा आहे, की हवामानाचा पॅटर्न वेगाने बदलत आहे. म्हणजे पूर आला होता, तिथे दुष्काळ आणि दुष्काळ आला होता, तिथे आता महापूर येतो. अलीकडच्या वर्षांमध्ये ज्या जिल्ह्यांमध्ये हा कल दिसला, त्यात कटक (ओडिशा), आंध्र प्रदेशातलं गुंटूर, कुर्नूल आणि श्रीकाकुलम, तेलंगणातलं महबूबनगर, नलगोंडा आणि बिहारमधल्या पश्चिम चंपारण यांचा समावेश आहे. गुजरातमधील राजकोट, सुरेंद्रनगर, राजस्थानमधील जोधपूर, अजमेर आणि महाराष्ट्रातील औरंगाबाद यासारखे जिल्हे आता दुष्काळाच्या छायेत आहेत. बिहार, उत्तर प्रदेश, ओडिशा आणि तामिळनाडूसारख्या राज्यांना दुष्काळ आणि पूर परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. आंध्र प्रदेश, तामिळनाडू आणि कर्नाटक या दक्षिणेकडील राज्यांमध्ये दुष्काळाचं सावट आहे.

नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या कॉस्ट ऑफ क्लायमेट ॲक्शन: डिस्प्लेसमेंट अँड डिस्ट्रेस मायग्रेशन रिपोर्टमध्ये असं म्हटलं आहे की २०५० पर्यंत ४५ दशलक्ष भारतीय हवामानाशी संबंधित आपत्तींमुळे विस्थापित होतील. या अहवालानुसार, २०२० पर्यंत १.४ कोटी लोक विस्थापित झाले आहेत. अहवालानुसार, दुष्काळ, समुद्राची वाढती पातळी, जलसंकट, शेती आणि परिसंस्थेचं नुकसान यामुळे लोकांना स्थलांतर करावं लागत आहे.

केंद्राच्या नॅशनल क्लीन एअर प्रोग्राममध्ये समाविष्ट असलेल्या दिल्लीसह इतर खराब हवाई शहरांच्या हवेच्या गुणवत्तेत तीन वर्षांनंतरही कोणतीही सुधारणा किंवा किरकोळ सुधारणा झालेली नाही.

गाझियाबाद हे तीन वर्षे देशातलं सर्वाधिक प्रदूषित शहर होतं, तर दिल्ली दुसऱ्या क्रमांकावर राहिलं. २०२४ पर्यंत १३२ गैर-प्राप्ती शहरांमध्ये पार्टिक्युलेट मॅटर पातळी २० ते ३० टक्क्यांनी कमी करण्यासाठी २०१९ मध्ये देशव्यापी एनसी-पी लॉंच करण्यात आले परंतु या काळात अनेक शहरांमध्ये पीएम पातळी वाढली. हा ट्रॅकर 'कार्बन कॉपी' हे न्यूज पोर्टल आणि महाराष्ट्रस्थित 'रेस्पायर लिव्हिंग सायन्सेस' या स्टार्ट अपच्या संयुक्त प्रयत्नातून तयार करण्यात आला आहे. नोएडा, दिल्ली, मुरादाबाद आणि जोधपूरमध्ये पीएच २.५ च्या पातळीत किरकोळ घट झाली आहे. अहवालानुसार २०१८-१९ ते २०२०-२०२१ या वर्षात एनसी-पी अंतर्गत ११४ शहरांना ३७५.४४ कोटी रुपये आणि २०२१-२०२२ या आर्थिक वर्षासाठी ८२ शहरांना २९० कोटी रुपये वाटप करण्यात आले आहेत. या कार्यक्रमात २०२१-२०२६ साठी ७०० कोटी रुपयांचं वाटप करण्यात आलं आहे. याचा परिणाम होऊन प्रशासन वाढत्या प्रदूषणावर मात करण्यात कितपत यशस्वी होतं ते आता बघायचं.

वार-वार
अतुल गुळवणी

## वॉटर टॅक्सी

वाढत्या लोकसंख्येपुढे विविध प्रकारची दळणवळणाची साधने आता खरोखरच अपुरी पडू लागलेली आहे. त्यामुळे दिवसेंदिवस रस्ते वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढत आहे. विशेष करुन मुंबई आणि परिसराला या वाहतूक कोंडीचा नित्याचा सामना करावा लागत आहे. यावर उपाय म्हणून मुंबई आणि परिसरात समुद्र अथवा खाड्यांमध्ये वॉटर टॅक्सी सुरु करण्यावर केंद्र सरकार भर देत आहे. याचाच एक भाग म्हणून मुंबई ते नवी मुंबई दरम्यान वॉटर टॅक्सीसेवेचा प्रारंभ गुरुवारी केंद्रीय मंत्री सर्वानंद सोनोवाल यांच्या हस्ते केला जात आहे. या वॉटर टॅक्सीचा फायदा नवी मुंबई परिसरात वास्तव्य करुन असलेल्या नोकरदार, व्यावसायिकांना मोठ्या प्रमाणात होणार आहे. अल्पवेळेत नवी मुंबईहून मुंबईला जाणे शक्य होणार आहे. यातून वेळेचे बचत होण्याबरोबरच महामार्गावरील वाहनांची संख्याही घटणार आहे. पर्यायाने वाहनांद्वारे होणारे हवा, ध्वनी प्रदूषण कमी होऊन नागरिकांना दिलासा मिळणार आहे. केंद्रीय रस्ते, वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची ही संकल्पना आहे. मुंबईसह संपूर्ण कोकणाला मोठ्या प्रमाणात समुद्रकिनारा लाभलेला आहे. या निसर्ग साधनसंपत्तीचा आतापर्यंत म्हणावा तसा वापर कुणीच केला नाही. पण आता गडकरी यांनी यासाठी पुढाकार घेत विविध योजना सुरु करण्यावर भर दिलेला आहे. याचाच वॉटर टॅक्सी हा एक भाग आहे. मुंबई-नवी मुंबईला जोडणारी ही वॉटर टॅक्सी सेवा सर्वसामान्यांना सध्यातरी न परवडणारी असली तरी भविष्याचा विचार करता ही सेवा निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. याच धर्तीवर रायगडातील किनारे मुंबईला जलमार्गाने जोडण्याची योजनाही केंद्राने आखली आहे.सध्या अलिबाग, उरण येथूनच जल वाहतूक सुरु आहे. पण भविष्यात अलिबाग, उरणसह मुरुड, श्रीवर्धन, पेण या परिसरातूनही जलमार्ग वाहतूक व्यवस्था सुरु केली तर निश्चितच फायद्याची ठरणार आहे. कमी खर्चात पण सुरक्षितपणे हा वाहतूक मार्ग सर्वांनाच फायद्याचा ठरणार आहे. यासाठी सर्वांनीच पुढाकार घेणे गरजेचे आहे.

## आरोपांची राळ

गेल्या काही दिवसांपासून सत्ताधारी शिवसेना आणि विरोधी पक्ष भाजपमधील राजकीय संघर्ष शिगेला पोहोचला आहे. याचे प्रत्यंतर दिवसेंदिवस राज्यातील जनतेला येत आहे. परस्परांवर आरोप, प्रत्यारोप करण्याबरोबरच प्रत्येकाची उणीदुणी काढण्यापर्यंत या दोन्ही पक्षांची मजल गेली आहे. हे कुठेतरी थांबणे राज्याच्या हिताचे ठरणार आहे. सत्ता गेल्याने भाजप आधीच पिसाळला आहे. त्यामुळे राज्यातील सत्ताधारी शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस या तिन्ही पक्षांना केंद्राच्या माध्यमातून त्रास देण्याचा भाजपचा प्रयत्न लोकशाहीला पूरक असा नाही हे वारंवार अधोरेखित झालेले आहे. ईडी, सीबीआय या केंद्रीय संस्थांच्या माध्यमातून भ्रष्टाचारी प्रकरणे बाहेर काढून एखाद्याला राजकीय आयुष्यातून उठविण्याचा डावच भाजपच्या काही नेत्यांनी मांडला आहे, असे म्हटले तर वावगे ठरु नये. पण हे राज्याच्या पंरपरेला न शोभणारे असेच आहे. आतापर्यंत सत्ताधारी, विरोधकांमध्ये संघर्ष झाले पण ते इतको टोकाला गेल्याचे कधीच राज्यातील जनतेने पाहिले नाही. यासाठी भाजपने जबाबदार विरोधी पक्ष म्हणून काम करणे अत्यंत गरजेचे आहे. दुर्दैवाने त्याकडेच भाजपचे नेतृत्व कानाडोळा करताना दिसते. त्यात आता शिवसेनेनेही आक्रमक धोरण स्वीकारत भाजपच्या विरोधात आरोप, प्रत्यारोप सुरु केलेले आहेत. यामधून दोघांचीही लक्तरे वेशीला टांगली जात आहेत. जनतेच्या मुलभूत प्रश्नांकडे सत्ताधारी शिवसेना आणि विरोधी भाजपचे दुर्लक्ष होत असल्याचे यावरुन दिसत आहे. आधीच कोरोनाची साथ, लॉकडाऊनमुळे राज्याची आर्थिक घडी पूर्णपणे विस्कटली आहे.त्यातून सावरायचे कसे याचा विचार या दोन्ही पक्षांनी करणे आवश्यक आहे. पण त्याकडे दुर्लक्ष करुन परस्परांची उणीदुणी काढली जात असतील जनतेला पुन्हा एकदा जागे व्हावे लागेल याचा विचार दोघांनी करणे गरजेचे आहे. आरोप, प्रत्यारोप करणारे भविष्यात कुठल्या क्षणी एकत्र येतील हे सांगणे कठीण आहे. त्यामुळे निदान भविष्याचा विचार शिवसेना, भाजपने आरोप, प्रत्यारोपाच जो काही डाव मांडला आहे तो थांबवावा.



## भगवद्गीता

त्याप्रमाणे सर्व शरीरांमध्ये मग तो मानव असो अथवा पशू असो, सर्वांमध्ये चेतना ही असतेच आणि यावरुन आपण आत्म्याची उपस्थिती जाणू शकतो. तरीही आत्म्याची ही चेतना परमात्म्याच्या चेतनेहून भिन्न आहे कारण परमात्म्याला भूत, वर्तमान आणि भविष्य या सर्वांचे पूर्ण ज्ञान असते. व्यक्तिगत जीवात्म्याच्या चेतनेचा, विस्मरणशील होण्याकडे कल असतो. जेव्हा तो आपल्या वास्तविक स्वरुपाला विसरतो तेव्हा तो श्रीकृष्णांच्या दिव्य उपदेशांद्वारे ज्ञान आणि प्रबुद्धता प्राप्त करतो. परंतु जीवात्म्याप्रमाणे श्रीकृष्ण विस्मरणशील नसतात. जर ते विस्मरणशील असते तर भगवद्गीतेतील श्रीकृष्णांची शिकवणूक निरुपयोगी झाली असती.

आत्म्याचे दोन प्रकार आहेत. एक म्हणजे सूक्ष्म अणुरुप आत्मा आणि दुसरा म्हणजे परमात्मा किंवा विभुआत्मा. याची सुद्धा कठोपनिषदात पुढीलप्रमाणे पुष्टी करण्यात आली आहे.

अणोरणीयान्महतो महीयानात्मास्य जन्तोर्निहतो गुहायाम् ।
तमक्रतुः पश्यति वीतशोको धातुः प्रसादान्महिमानमात्मनः ।।

'परमात्मा आणि जीवात्मा दोघेही जीवाच्या एकाच वृक्षरुपी शरीरामधील हृदयामध्ये स्थित आहेत. जो भौतिक इच्छा व शोक यामधून मुक्त झाला आहे केवळ तोच भगवद्कृपेने आत्म्याचा महिमा जाणू शकतो.' पुढील अध्यायामध्ये सांगितल्याप्रमाणे श्रीकृष्ण हे परमात्म्याचेही उगमस्थान आहेत आणि आपले मूळ स्वरुप विसरणारा अर्जुन हा अणुरुप जीवात्मा आहे. म्हणून त्याला श्रीकृष्ण किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींकडून (आध्यात्मिक गुरु) ज्ञानप्राप्ती करुन घेणे आवश्यक आहे.

वेदाविनाशिनं नित्यं य एनमजमव्ययम् ।
कथं स पुरुषः पार्थ कं घातयति हन्ति कम् ।।२१।।

वेद- जो जाणतो; अविनाशिनम्- अविनशीः, नित्यम्- नित्य अस्तित्वात असणारा; यः- जो कोणी; एनम्- हा (आत्मा); अजम्- जन्मरहित; अव्ययम्- निर्विकार किंवा क्षयरहित; कथम्- कसा; सः- तो; पुरुषः- पुरुष; पार्थ- हे पार्थ; कम्- कोणाला; घातयति- मारवितो; हन्ति- मारतो; कम्- कोणाला.

हे पार्थ! जो व्यक्ती जाणतो की, आत्मा हा अविनाशी, शाश्वत, अजन्मा आणि अव्ययी आहे, तो कोणाला कसा मारील किंवा कोणाला कसा मारवील?

तात्पर्यः प्रत्येक गोष्टीची स्वतःची अशी उपयुक्तता असते आणि जो मनुष्य पूर्ण ज्ञानात स्थिर झाला आहे तो त्या वस्तूचा योग्य उपयोग कसा व कुठे करावा हे जाणतो. त्याचप्रमाणे हिंसेचीही उपयुक्तता असते आणि हिंसेचा उपयोग कसा करावा हे ज्ञानी व्यक्तीवर अवलंबून असते. जर खुनाबद्दल अपराधी असणाऱ्या एका व्यक्तीला, न्यायाधीशाने मृत्यूदंडाची शिक्षा फर्मावली तर त्यासाठी न्यायाधीशाला दोषी ठरविता येत नाही, कारण तो न्यायसंहितेनुसारच दुसऱ्या व्यक्तीला शिक्षा फर्मावितो. खुनी व्यक्तीला देहांताची सजा देण्यात यावी याची पुष्टी 'मनु-संहितेत' करण्यात आली आहे. कारण असे केल्यामुळे त्याने पूर्वजन्मी केलेल्या महापापांबद्दल त्याला दुःख भोगावे लागणार नाही. म्हणून खुनी मनुष्याला राजाने केलेली फाशीची शिक्षा ही वस्तुतः हितकारकच आहे. त्याचप्रमाणे श्रीकृष्ण जेव्हा अर्जुनाला युद्ध करण्याची आज्ञा देतात तेव्हा निश्चितपणे जाणले पाहिजे की, या प्रकारची हिंसा ही उच्च प्रतीच्या न्यायप्रदानासाठी आहे. यासाठीच अर्जुनाने त्यांच्या आज्ञेचे पालन केले पाहिजे. श्रीकृष्णांप्रीत्यर्थ युद्धकर्म करताना केलेली या प्रकारची हिंसा ही मुळी हिंसा नाहीच. कारण कोणत्याही परिस्थितीत मनुष्य अर्थात, त्याचा आत्मा मारला जात नाही, हे अर्जुनाने योग्य रितीने जाणले पाहिजे. म्हणून न्यायप्रदानासाठी तथाकथित हिंसा करण्यास अनुमती आहे. शस्त्रक्रिया ही रोगी व्यक्तीला मारण्यासाठी नसून त्याला स्वस्थ करण्यासाठी असते. म्हणून श्रीकृष्णांच्या आज्ञेनुसार अर्जुनाने केलेले युद्ध हे पूर्ण ज्ञानयुक्त आहे व त्यापासून पापाचे फळ भोगण्याचा प्रश्नच उद्भवत नाही (क्रमशः)

(भगवद्गीता स्पर्धा माहिती पान क्रमांक ८ वर)

## लोकसंसद

### साहसी पर्यटन जरा जपून...



अलिकडे पुणे व महाराष्ट्रातील इतर परिसरात धोकादायक व साहसी पर्यटनामध्ये मृत्यूचे प्रमाण वाढले आहे. गेल्या काही दिवसातील घटना या दृष्टीने महत्वाच्या आहेत. नुकताच मनमाडजवळ हाडबीच्या शेंडीवरून पडून दोन तरुणाचा मृत्यू झाला. त्या अगोदर काही दिवसांपूर्वी कर्जतजवळील ढाक विहीर परिसरात मोळीच्या वाटेवरून घसरून दरीत कोसळून औरंगाबादमध्ये एकाच मृत्यू तर तोरणा किल्यावर वरून कोसळणारा दगड लागून एका तरुणाचा मृत्यू झाला. एकूणच साहसी पर्यटन काही बाबतीत पूर्ण माहिती अभावी धोक्याचे ठरू शकते. महाराष्ट्रात अनेक किल्ले, दऱ्या, घाट, विविध शिल्पे, धबधबे इत्यादी आहेत. आज अनेक ठिकाणी अशा वाटेवरून पर्यटक जाताना दिसतात. यातील काही वाटा धोकादायक सुद्धा असू शकतात. काही वेळा दाट धुके, पाऊस तसेच निसरडी वाट यामुळे अशा ठिकाणी धोका निर्माण होतो. त्यातही जर समूहाने पर्यटन नसेल व वाट चुकली तर आणखीन अवघड परिस्थिती निर्माण होते. अनेक जण धोका माहित असूनही त्याकडे दुर्लक्ष करतात. गणपतीपुळे येथे समुद्रकिनारा काही ठिकाणी धोक्याचा आहे असे बोर्ड असूनही पर्यटक तेथे धाव घेतात व आपला जीव धोक्यात घालतात. त्यातच अशा वेळी अनेक पर्यटक सेल्फी काढण्याच्या नादात आपल्या जीवावर संकट ओढवून घेतात. आजकाल राज्य सरकारच्या अध्यादेशातील तरतुदी नुसार साहसी उपक्रम आयोजित करणाऱ्या संस्थांना नोंदणी करणे आवश्यक आहे असे कळते. तरीही आयोजित केल्या जाणाऱ्या सहलीसाठी पर्यटक या बाबींची खात्री करत नाहीत. त्याचा तोटा त्यांना होण्याची शक्यता असते. अशा वेळी बचाव समन्वय केंद्राच्या हेल्प लाईनवर त्यांना विसंबून राहावे लागते. गेल्या चार वर्षातील बचाव मोहिमेची संख्या सुद्धा खूपच म्हणजे जवळपास दुपटीहुन अधिक वाढलेली आहे. विशेष म्हणजे यातील स्वयंसेवक हे मोबदल्याशिवाय काम करतात व गेल्या पाच वर्षात जवळपास त्यांनी ९०० हून अधिक लोकांचे प्राण वाचविले आहेत. एकूणच डोंगर दऱ्यात पर्यटन करताना त्या भागाची अगोदर पूर्ण माहिती घ्यावी. तसेच त्या भागातील राहणाऱ्या लोकांकडून तेथील धोकादायक प्राणी व वाटा यांची माहिती घ्यावी. एकट्याने पर्यटन करण्याऐवजी अशा साहसी उपक्रम राबविणाऱ्या संस्थांच्या मार्फतच करावे. जीवरक्षक साधने जवळ ठेवावी. अनावश्यक धोक्याच्या ठिकाणी सेल्फी काढू नये. एकूणच आपला जीव सांभाळून पर्यटन करावे तरच त्या पर्यटनाचा आनंद लुटता येईल.

**- शांताराम वाघ**, पुणे

### केवळ आकडेवारीत कमी झालेली महागाई

युपीए सरकारच्या तुलनेत आमच्या सरकारला महागाई नियंत्रणात ठेवण्यात अधिक यश आले आहे. असा दावा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना राज्यसभेत केला. हा दावा करताना त्या पुढे म्हणाल्या की, जागतिक आर्थिक संकटाच्या काळात म्हणजे २००८-०९ मध्ये असलेल्या महागाई दरापेक्षा (९.१ टक्के) २०२०-२१ मध्ये कोरोनाच्या अभूतपूर्व संकटात महागाईचा दर (६.२ टक्के) कमी होता. नुसती आकडेवारी पाहिली तर त्यांचा दावा एकवेळ पटेलही पण वस्तुस्थिती वेगळेच दर्शवते. कोरोना काळात संपूर्ण भारतात कोरोना रुग्णसंख्या उच्चांक गाठत असताना आरोग्ययंत्रणेवर ताण पडला होता. कोरोनाच्या कचाट्यात सापडलेल्यांना आरोग्यसुविधा मिळवताना नाकी नऊ आले होते. त्यातच टाळेबंदीमुळे काहींचे रोजगारही बुडाले. उत्पन्नाचे मार्ग बंद झाल्यामुळे रोजच्या जगण्याची भ्रांत कित्येकांना पडली. यातच दुष्काळात तेरावा महिना म्हणून याच काळात महागाईही प्रचंड वेगाने वाढत होती. इंधन दरवाढीबरोबरच, घरगुती गॅस सिलेंडरच्या वाढत्या किंमतींमुळे सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लागली. यातच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्चा मालाच्या तुटवड्यामुळे खाद्यतेलाच्या किंमतींमध्ये सातत्याने वाढ होत होती आणि अजूनही होत आहे. शेंगदाण्याचे तेल, पाम तेल, सोयाबीनचे तेल या सगळ्याच्या किंमती भडकल्या आहेत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना आता खाद्यतेल किंमत वाढीचाही आर्थिक भार सहन करावा लागत आहे. खाद्यतेलाच्या किंमती तब्बल २५ टक्क्यांनी वाढल्या आहेत. जून ते नोव्हेंबर २०२० पर्यंत घरगुती गॅस सिलिंडरचा दर सहाशे रुपयापर्यंत होता. मात्र सध्या हाच दर नऊशे रुपयांवर गेला आहे. त्यातच एप्रिल २०२० पासून अनुदान रक्कम मिळणेही बंद झाले आहे. खाद्यतेल, इंधन, वीज आणि जीवनावश्यक वस्तुंच्या वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्यांवर मोठा परिणाम होत आहे. कोरोना आजारापासून वाचायचे म्हटले तरी महागाईने जीवन असह्य व्हावे अशी परिस्थिती कोरोनाकाळात झाली होती. गरीबांना काही प्रमाणात सरकारकडून मदत झाली, तर श्रीमंतांना हाती असलेला पैसा या महागाईत कामी आला. परंतु या दोहोंच्या मधला सर्वसामान्य मात्र खचून गेला. अजूनही परिस्थिती बदललेली नाही. त्यातच अर्थमंत्र्यांचा कमी महागाई दराचा दावा हे जखमेवर मीठ चोळण्याचाच प्रकार नव्हे का? केवळ आकडेवारी दाखवून महागाई कमी असल्याचा नुसता दावा न करता महागाई कमी करण्याच्या दृष्टीने प्रत्यक्ष प्रयत्न व्हायला हवेत.

**- दीपक गुंडये**, वरळी

## महत्त्वाचे

### दागिने लंपास

**रत्नागिरी :** तालुक्यातील गोळप सडा येथून गावी गेलेल्या महिलेच्या घरातील ५१ हजार रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने चोरीला गेले आहेत. याबाबत जयश्री अशोक सोहनी (५५) यांनी पूर्णगड पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. जयश्री या कामानिमित्त बाहेरगावी गेल्या होत्या. त्यांच्या घरात घर कामासाठी दोन महिला काम करतात. यापैकी एका महिलेने जयश्री घरात नसल्याचा फायदा घेत घरातील गोदरेज कपाटातील मंगळसूत्र, सोन्याची अंगठी व कानातील दोन रिंग असा एकूण ५१ हजार रुपयांचा मुद्देमाल लांबवला. या संशयावरून अधिक तपास पोलीस हवालदार ललित देवुसकर करीत आहेत.

### अपघाती मृत्यू

**चिपळूण :** मुंबई- गोवा महामार्गावरून दळवटणेला दुचाकीवरुन प्रवास करणाऱ्या चौपदरीकरणाचे काम करणाऱ्या चेतक कंपनीच्या डंपरने मागून जोरदार धडक दिली. यात दुचाकीवर मागे बसलेली तरुणी जागीच ठार झाली. तर दुचाकीचालक युवती जखमी झाली. श्रुती संतोष शिर्के (१८) असे मृत युवतीचे तर जान्हवी एकनाथ जाधव (१९) असे जखमी युवतीचे नाव आहे.

मृत्यू झालेल्या श्रुतीला भरपाई मिळावी, यासाठी तिच्या नातेवाईकासह राजकीय पदाधिकाऱ्यांनी त्यांना घेराव घातला. भरपाई मिळत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही अशी भूमिका नातेवाईक मंडळीनी घेतली होती. अखेर भरपाई देण्याचे मान्य करण्यात आले.

### विश्राम सावंत यांचे निधन

**रत्नागिरी :** तालुक्यातील वाटद पश्चिम येथील बौद्धजन पंचायत शाखा क्रमांक ३२ या शाखेचे धडाडीचे माजी अध्यक्ष, बावीस खेडी बौध्दजन संघ वाटद-खंडाळा संघटनेचे माजी कोषाध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते तसेच वाटद गावचे माजी सरपंच विश्राम तुकाराम सावंत उर्फ व्ही. टी. सावंत (६७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या माजी सभापती व जिल्हा परिषदेच्या विद्यमान सदस्या ऋतुजा राजेश जाधव व डॉ.विकी सावंत यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, तीन मुली, जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे. या निधनाने सर्व स्तरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## चिपळूण नगरपरिषद निवडणूक

# शिवसेनेचा स्वबळाचा नारा

**॥ बांधावी लागणार एकीची मूठ**

**॥ अंतर्गत मतभेदांचे आवाहन**

**। चिपळूण । वृत्तसंस्था ।**

येथील नगरपरिषदेची निवडणूक स्वबळावर लढण्याची तयारी शिवसेनेने दाखवली आहे. मात्र एकहाती सत्ता घ्यायची असेल तर सर्वप्रथम शिवसेनेत एकीची मूठ बांधावी लागणार आहे. शहरात शिवसेनेची ताकद असली तरी एकीचे आवाहन म्हणजे शिवधनुष्य पेलण्याचा प्रकार ठरणार आहे.

काँग्रेस, राष्ट्रवादीत होणारी मतांची विभागणी शिवसेनेसाठी फायद्याची ठरणार आहे. मात्र या निवडणुकीत शिवसेनेकडून नेतृत्व कोण करणार, याची उत्सुकता आहे. परिषदेत शिवसेनेचे संख्याबळ जास्त असले तरी शिवसेनेची कामगिरी नागरिकांच्यादृष्टीने तसेच कार्यकर्त्यांच्यादृष्टीने समाधानकारक नाही. आ. भास्कर जाधव, माजी आ. सदानंद चव्हाण, जिल्हाप्रमुख सचिन कदम, शहरप्रमुख उमेश सकपाळ, विधानसभा क्षेत्रप्रमुख बाळा कदम यांच्यासह शिवसेनेच्या शहरातील पदाधिकाऱ्यांची एकजूट करणे गरजेचे आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेत शिवसेनेचे संख्याबळ जास्त असले तरी शिवसेनेची कामगिरी नागरिकांच्यादृष्टीने तसेच कार्यकर्त्यांच्यादृष्टीने समाधानकारक नाही.

शिवसेनेचे प्रभागातील कार्यकर्ते कामे सूचवितात, मात्र ती होत नाहीत. कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्या हिताचे कामही होत नाही. त्यामुळे शिवसेनेत अंतर्गत धुसफूस आहे. नेत्यांमध्ये आ.भास्कर जाधव आणि सदानंद चव्हाण यांच्यात मतभेद आहेत. भास्कर जाधव यांनी पक्षाकडे काही जागा मागितल्या आहेत. निवडणुकीत नेतृत्व करण्याची संधी मिळाली नाही तरी पक्षाकडून मिळणाऱ्या जागांवर आपले उमेदवार निवडून आणण्याचे काम ते करतील. मात्र जाधवांचा शिवसेनेच्या सर्वच उमेदवारांना उपयोग व्हावा, यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.

परिषदेवर वर्चस्व मिळवण्यासाठी शिवसेना आणि राष्ट्रवादीत नेहमीच स्पर्धा राहिली आहे. सध्या पालिकेत शिवसेनेचे संख्याबळ जास्त आहे. पालिकेत राष्ट्रवादीचे केवळ तीन सदस्य आहेत. आमदार शेखर निकम यांनी शहरातील विविध विकासकामांसाठी निधी आणून राष्ट्रवादीचे वेगळे अस्तित्व दाखवण्याचा प्रयत्न केला.

माजी आ. रमेश कदम यांच्या साथीने ते सत्ता मिळवण्यासाठी प्रयत्न करणार आहेत. मात्र समोर काँग्रेससह शिवसेनेचे मोठे आव्हान उभे राहणार आहे. काँग्रेस, राष्ट्रवादीत होणारी मतांची विभागणी शिवसेनेसाठी फायद्याची ठरणार आहे. आता परिषदेच्या निवडणुकीत शिवसेनेकडून नेतृत्व कोण करणार याची सर्वांना उत्सुकता आहे.




**दोन्ही काँग्रेस स्वतंत्र लढणार..**

*येत्या काही दिवसांत पालिका निवडणुकीची आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. काँग्रेस हे राष्ट्रवादीबरोबर जाण्यास तयार नाही. त्यामुळे दोन्ही काँग्रेस स्वतंत्र लढणार, हे निश्चित झाले आहे. राष्ट्रवादी आणि शिवसेनेची युती होणार, अशी चर्चा सुरू असताना खा. विनायक राऊत यांनी पालिका निवडणूक स्वबळावर लढण्यासाठी तयारी करणयाची सूचना कार्यकर्ते व पदाधिकारी यांना केली आहे.*

> चिपळूण पालिकेची निवडणूक शिवसेनेच्या चिन्हावर लढवताना सर्वच पदाधिकारी व कार्यकर्ते एकत्र येतील. कोणत्या जागेवर कोणाला उमेदवारी द्यायची हा निर्णय पक्षाचा असेल. सर्वांना विश्वासात घेऊनच उमेदवार दिले जातील. त्यामुळे नाराजीचा प्रश्न येणार नाही. उमेदवारी मिळणार नाही, त्यांना अन्य ठिकाणी न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल.
>
> – **विनायक राऊत,** शिवसेना खासदार

## जलजीवन मिशन योजना समस्यांबाबत बैठक

**राज्यमंत्री संजय बनसोडे यांची प्रमख उपस्थिती**

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

येथे पाणीपुरवठा तथा स्वच्छता राज्यमंत्री संजय बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थित चिपळूणमधील जलजीवन मिशन योजनांच्या समस्यांबाबत आढावा घेण्यात आला.

या बैठकीला आ. शेखर निकम, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग प्रधान सचिव जस्वाल, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सचिव अभिषेक कृष्णा, अधिक्षक अभियंत्रा सी. आर. गजभिये आदी अधिकारी उपस्थित होते. चिपळूण-संगमेश्वर विधानसभा मतदासंघात जलजीवन मिशन अंतर्गत सुरु असणारी कामे अतिशय संध गतीने जात आहेत. यापार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्था, लोकप्रतिनिधी यांनी संबंधित समस्यांचे निराकरण होण्यासाठी



पाठपुरावा केला होता. तर आ.शेखर निकम यांनी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक राज्यमंत्री संजय बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थित आयोजित करण्याची मागणी केली होती.

यानुसार आयोजित बैठकीमध्ये जलजीवन मिशन योजनेच्या आराखड्यामध्ये समाविष्ठ असलेल्या चिपळूण-संगमेश्वर विधानसभा मतदारसंघातील गावातील ज्या नळपाणी योजनेची अंदाजपत्रके तातडीने करुन घेण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

संगमेश्वर तालुक्यातील तांत्रिकदृष्ट्या आराखड्यात समावेश नसलेल्या ६४ गावांचा व चिपळूण तालुक्यातील २१ गावांचा येणाऱ्या आर्थिक वर्षामध्ये समाविष्ट करुन तातडीने अंदाजपत्रक तयार करण्याच्या सूचना संबंधित विभागाला देण्यात आल्या आहेत.

तसेच आरखड्यातील मंजूर असलेल्या अंदाजीत रक्कमेपेक्षा जादाचा निधी लागत असल्यास देण्याचे मान्य करण्यात आले आहे. तसेच पूर्वीच्या असलेल्या नळपाणी योजनेच्या विहरी, टाक्या यांची नोंद नसल्यामुळे त्यांची जिल्हाधिकाऱ्यांमार्फत नोंद करुन घेणे संदर्भात चर्चा झाली. संगमेश्वर तालुक्यातील महाराष्ट्र जीवन प्राधिरण कडील अंत्रवली, कळंबस्ते, फणसवणे, उमरे या गावाच्या रु.११ कोटी ९१ लाखाच्या अंदाजपत्रक असलेल्या योजनेस तातडीने मंजूरी देणेबाबत सूचना करण्यात आल्या.

## विकासकामांचा शुभारंभ



**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

संगमेश्वर तालुक्यातील वाडावे सराडगावात विकासकामांचा शुभारंभ श्रीफळ वाढवून करण्यात आला. या विकासकामांमध्ये वाडावेसराड शाळा वर्गखोली उद्घाटन, राळेवाडी रस्ता लोकार्पण, राळेवाडी अंतर्गत पाखाडी रस्ता आदी विकास कामांचा समावेश आहे.

याप्रसंगी शिवसेनेचेच्या जिल्हापरिषदेच्या सदस्य रचनाताई महाडीक, प्रकाश घाणेकर, वाडावेसराड ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक क्षितिज नागवेकर, उपसरपंच हनीफ वलेले, सदस्य नंदकुमार नागवेकर, संदीप नागवेकर कळंस्ते गावाचे सरपंच रत्नागर सनगरे, पंचायत समितीचे सदस्य निधी सनगरे आदी मान्यवर उपस्थित होते.

## महिलेला मारहाण

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**

शहरातील अभ्युद्यनगर येथे घरात शिरून महिलेला मारहाण केल्याचा गंभीर प्रकार पुढे आला आहे. याशिवाय जीवे मारण्याची धमकीही पिडीता आणि तिच्या मुलाला देण्यात आली. या प्रकरणी चार संशयितांविरुद्ध शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ममता हनुमंत यादव (३५) असे पिडीतेचे नाव असून, त्या प्रकृती अस्वस्थेमुळे आराम करत असताना, आरोपी जगन्नाथ खेडेकर, त्यांचा मुलगा, पत्नी व सून हे संशयित तेथे आले. दरवाजा जोरजोरात काठीने ठोठावू लागले व त्यांनी काठीने खिडकीच्या काचा आणि मीटर फोडले. त्यानंतर ते दार उघडा, असे ओरडत होते. काय प्रकार सुरू आहे, काय झाले हे पाहण्यासाठी ममता यांनी दार उघडले. एवढ्यात खेडेकर त्यांच्या घरात शिरले आणि ममताच्या मुलाला मारण्यासाठी काठी उगारली आणि जीव घेतो, अशी धमकी दिली. यावेळी ममता त्याला वाचविण्यासाठी पुढे गेल्या असता खिडकीच्या फुटलेल्या काचेने खेडेकर यांनी ममता यांना मारले. यामध्ये त्या जखमी झाल्या.

या मारहाणीत संशयितांनी बंदुकीची गोळी घालून ठार मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी ममता यादव यांनी शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. तक्रारीवरून पोलिसांनी संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास शहर पोलिस अंमलदार करीत आहेत.

## ओबीसी मोर्चा करणार

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

चिपळूणमध्ये काँग्रेस बैठकीत ओबीसी मोर्चा यशस्वी करण्याचा निर्धार महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस ओबीसी विभाग आयोजित ओबीसी समाजाच्या आरक्षणावर केंद्र सरकारला जाब विचारण्यासाठी १८ फेब्रुवारी रोजी रत्नागिरी येथे भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून, हा मोर्चा यशस्वी करण्याचा निर्धार चिपळूण काँग्रेसतर्फ व्यक्त करण्यात आला आहे.

यासंदर्भात नियोजनासाठी चिपळूण तालुका काँग्रेसचे अध्यक्ष प्रशांत यादव यांच्या सूचनेनुसार शासकीय विश्रामगृह येथील आयोजित बैठकीत हा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

या बैठकीत काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रशांत यादव बाहेरगावी असल्याने त्यांनी फोनवरून या बैठकीत मार्गदर्शन केले. या बैठकीला माजी उपनगराध्यक्ष सुधीर शिंदे, माजी नगरसेवक करामत मिठागरी, माजी नगरसेविका सफा गोठे, माजी नगरसेवक लियाकत शाह, ज्येष्ठ नेते प्रकाश साळवी, महादेव चव्हाण, वासुदेव सुतार, ओबीसी विभागाचे प्रदेश सचिव संजय जाधव, अजित कासार, दीपक निवाते, शमून घारे, रविना गुजर, निर्मला जाधव, वैशाली विचारे, श्रद्धा कदम, नंदा भालेकर, वर्षा खटके, मैनुद्दीन सय्यद आदी पदाधिकारी तथा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ११ कोटी फुकट गेल्याची टीका अज्ञानातून

**मुझफ्फर मुकादम यांचे प्रतिपादन**

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**

म्हाप्रळ-आंबेत पुलाच्या बळकटीकरणाचे नेमके कोणते काम पूर्ण झाले आहे व कोणते काम अद्याप बाकी आहे, याची कोणतीही खातरजमा न करताच अज्ञानाने ११ कोटी रुपये फुकट गेल्याची टीका केली जात आहे. राज्यात सध्या तीन पक्षांचे एकत्र सरकार आहे. त्यामुळे हे काम पूर्ण करण्याची जबाबदारी तीनही पक्षांची आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादीचे मंडणगढ तालुकाध्यक्ष मुझफ्फर मुकादम यांनी केले आहे.



खा. तटकरे यांच्यावरील टीकेचा समाचार घेताना मुकादम म्हणाले, सावित्री पूल दुर्घटनेनंतर म्हाप्रळ-आंबेत पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट झाले. विद्यमान खा. सुनील तटकरे यांनी तत्कालीन बांधकाममंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे पाठपुरावा करून ११ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. बांधकाम विभागाने सहा महिन्यांपूर्वी या पुलाचे बळकटीकरणाचे काम पूर्ण केले. पुलाला निधी मंजूर होऊनही काम रखडले होते. दोन वर्ष स्थानिकांसह या मार्गावरून प्रवास करणाऱ्या मंडणगड व दापोली तालुक्यांचे मुंबई-पुणे मार्गावरील वाहतुकीची मोठी अडचण झाली होती.

मात्र, पाठपुरावा करून पुलाच्या रेंगाळेल्या कामाचा प्रश्न मार्गी लावला. या मार्गावरील वाहतूक खुली केली. या पार्श्वभूमीवर टीकाकारांनी या संदर्भातील खरी माहिती घेऊन मगच लोकप्रतिनिधींना दूषणे द्यावीत.

गेल्या आठवड्यात पुलाची समस्या गंभीर असल्याचे लक्षात येताच तटकरे यांनी पाहणी करून आवश्यक दुरुस्तीकरिता दहा कोटी रुपयांचा निधी तातडीने मिळवून देण्याचे तसेच या कामात आधुनिक बांधकाम तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. टीका करण्यापेक्षा निधी कोण देतो, पूल कोण बांधतो, कामावर नियंत्रण ठेवतो, झालेल्या घटनाक्रमात खरोखरच कोणाची चूक आहे, हे समजून घेऊनच टीका करावी. कोणाचीही बदनामी करु नये, अशी सूचना त्यांनी केली.

## देश-विदेश

### लवकरच युजीसी नेटचा निकाल

**नवी दिल्ली :** डिसेंबर २०२० आणि जून २०२१ ची युजीसी नेट परीक्षेचा निकाल येत्या दोन दिवसांत जाहीर होणार आहे. युजीसीने एका पत्रकाद्वारे याची घोषणा केली. कोव्हिडच्या प्रादुर्भावामुळे युजीसी नेट परीक्षा पुढे ढकलण्यात आली होती. त्यानंतर डिसेंबर २०२० आणि जून २०२१ मधील परीक्षा एकत्रितपणे अनुक्रमे २० नोव्हेंबर २०२१ आणि ५ जानेवारी २०२२ रोजी या परीक्षा घेतल्या. देशभरातील २३९ शहरांमध्ये ८३७ केंद्रांवर ८१ विषयांची परीक्षा पार पडली होती.

# महाराष्ट्राची जनता भाजपाला जागा दाखवेल

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

महाविकास आघाडी सरकार पाडण्यासाठी भाजपाकडून दबावतंत्राचा वापर होतोय, हे लोकशाहीला घातक आहे. आम्ही भाजपची सर्व काळी कृत्ये जनतेसमोर घेऊन जाणार आहोत. भाजपाला महाराष्ट्राची जनता त्यांची जागा दाखवेल.आज त्यांचा वेळ आहे पण वेळ बदलेल ना, हे काही अमरपट्टा घेऊन आलेले नाहीत. असे म्हणत काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपावर निशाणा साधला आहे.




**नाना पटोले यांचा घणाघाण**

शिवसेना नेते संजय राऊत यांची स्फोटक पत्रकार परिषद झाल्यानंतर नाना पटोले यांनी माध्यमांना प्रतिक्रिया देत काँग्रेसची भूमिका मांडली होती.

नाना पटोले म्हणाले की, महाविकास आघाडी पाडण्यासाठी अनेकदा प्रलोभन आणि दबावतंत्राचा वापर झाला, हा खऱ्या अर्थाने मोठा आक्षेप आहे. कोणाच्या इमारती किती आहेत? कोणी काय केलं? हे सगळे भाजपावाले दूधाने धुतलेले आहेत, असे तर नाही. पण खरा आक्षेप जो आहे की, सरकार पाडण्यासाठी सातत्याने दबाव आणला जातोय, हा जो आक्षेप आहे हाच लोकाशाहीसाठी घातक आहे. म्हणून या आक्षेपाकडे जास्त जोर देण्याची गरज आहे.

यामुळे त्या विषयावर आज आम्ही काँग्रेसकडून कुठलीही भूमिका मांडणार नाही. परंतु संजय राऊत यांनी जी भूमिका मांडली आहे त्यामध्ये निश्चितपणे आम्ही जनतेसमोर आम्ही जाऊ. दबावतंत्र वापरून खोटे आरोप लावून महाविकासआघाडी सरकार पाडायचा केंद्र सरकाचा जो प्रयत्न आहे, या विषयाकडे आम्ही जनतेचे लक्ष वेधू. असा सूचक विश्वास नाना पटोले यांनी दर्शविला आहे.

**राजकीय भूकंपाचे संकेत**

दरम्यान, १० मार्च रोजी होणारा मंत्रीमंडळ फेरबदल हा राजकीय भूकंप असेल, असे सूचक विधान महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केले आहे. यामुळे पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळामध्ये बदल होणार असल्याची घोषणा पटोले यांनी भंडारदऱ्यामधील एका जाहीर सभेमध्ये केली. १० मार्च रोजीच उत्तर प्रदेश, पंजाब, मणिपूर, गोवा आणि उत्तराखंड विधानसभेच्या निवडणुकीचे निकाल जाहीर होणार आहेत. यावर काँग्रेससोबत सत्तेत असणारे शिवसेना आणि राष्ट्रवादी काय भूमिका मांडतात याकडे सर्वांची नजर आहे.

## पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही नसल्याने हायकोर्टाची नाराजी

**। मुंबई । वार्ताहर ।**

राज्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आहे. आता आम्ही प्रशासन चालवायचे का? असा सवाल खंडपीठाने राज्य सरकारला केला आहे.

पोलीस ठाण्यात सीसीटीव्ही कॅमेरे असायला हवेत, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. मात्र यावर सरकारने अंमलबजावणी केलेली नाही. अनेक ठिकाणी कॅमेरे नाहीत, तर जिथे आहेत ते बंद पडले आहेत, असे याचिकेद्वारे न्यायालयात सांगण्यात आले. यावर सविस्तर अहवाल देण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते. त्यानुसार अहवाल सादर करण्यात आला.

नियोजन आणि समन्वय समितीचा अहवाल सादर न केल्याबद्दल खंडपीठाने नाराजी व्यक्त केली. प्रत्येक वेळी न्यायालयाने निर्देश दिल्यावर तुम्ही काम करणार का, असे न्यायालयाने विचारले. पोलीस ठाण्यात काय चालते हे कळू नये, यासाठी हे आहे का, असा सवाल खंडपीठाने केला आहे. तसेच याबाबत आवश्यक ती भूमिका घेण्याचे आदेश खंडपीठाने सुनावणीअंती दिले आहेत.

# मावळात ऐतिहासिक लेण्यांची पडझड

**कार्ला, भाजे, बेडसे, घोरावडेश्वरमध्ये पडल्या चिरा**

*। पुणे । वृत्तसंस्था ।*

*मावळा परिसरातील लोहगड, विसापूर, तुंग, तिकोणा, राजमाची, ढाकगड किल्ले तर कार्ला, भाजे, बेडसे, घोरावडेश्वर या मुख्य लेण्या आहेत. मात्र, या लेण्यांची काही ठिकाणी पडझड झाली असून, काही ठिकाणी चिरा पडल्या आहेत.*



*भारतात अनेक राजवटींचा ऐतिहासिक व प्राचीन वारसा विपूल आहे. आपल्याकडे गडकिल्लेसोबत प्राचीन वास्तू पाहावयास मिळतात. पुणे जिल्ह्यातील मावळ तालुका हा प्राचीन वास्तूंनी समृद्ध आहे. मावळ हा पूर्वीचा व्यापारी मार्ग होता. आताचा मावळ म्हणजे पूर्वीचा मामलेहार प्रदेश. हा एक समृद्ध आणि गजबजलेला व्यापारी मार्ग होता. लेणी म्हणजे डोंगर, टेकडी, पर्वत, खडक कोरून तयार केलेल्या गुहांमध्ये भिक्ष संन्यास, तपस्या, विश्रांतीसाठी करू लागला. लेणी ही प्रामुख्याने सातवाहन, राष्ट्रकुट या राजवंशाच्या काळात कोरल्या गेल्या. अशा वैशिष्ट्यपूर्ण लेण्यांमध्ये मावळातील कार्ले, भाजे, बेडसे, घोरावडेश्वर अशा परिचित लेण्या तर येलघोल, पाटण, भंडारा डोंगर, पाले, उकसान व इतर अपरिचित लेण्या आहेत. येथील मुख्य लेण्यांमध्ये चैत्यगृह, विहार, पोड्या (पाण्याची टाकी) शिल्पकला व मूर्तिकला आढळते. पुरातन काळात बौध्द भिक्षू हे धर्म प्रसारार्थ भारतभर फिरत असे. धर्मप्रसारासाठी त्यांची सहज व सोपी सोय व्हावी म्हणून लेण्या खोदल्या जात असे.*

*प्रत्येक लेण्या या दानातून होत असे असा उल्लेख आपल्याला शिलालेखांतून मिळतो. ध्यानधारणा करण्यासाठी लेणीचा वापर केला जाई. मावळ भागातील गडकिल्ल्यांचे संवर्धन तर होत आहे. लेण्यांकडे दुर्लक्ष होत असून, या लेण्यांचे संवर्धन व काही ठिकाणी झालेली पडझड दुरुस्ती करून मावळातील ऐतिहासिक लेण्यांचा वारसा जपण्याची मोठी आवश्यकता आहे.*

> मावळाला लाभलेल्या ऐतिहासिक वारशामुळे परदेशातही आपल्या मावळाची ओळख आहे. अशा या ऐतिहासिक वारसा लाभलेल्या वास्तूंचे संगोपन होणे खूपच गरजेचे आहे. मावळातील प्रमुख लेण्या परिचित असल्या तरी इतर अपरिचित लेण्यांकडे बऱ्याच जणांचे पाय वळताना दिसत नाहीत. मावळातील अशा लेण्यांचा विकास व जतन होणे खूपच गरजेचे आहे.
>
> – **संतोष दहिभाते,** इतिहासप्रेमी

## मार्क झुकेरबर्गची 'मेटामेट्स'ची घोषणा

**कंपनीचे ब्रीदवाक्यही बदलले**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

गेल्या महिन्याभरात फेसबुकची कमी झालेली युजर्सची संख्या, मार्क झकरबर्गच्या वैयक्तिक संपत्तीत तसेच शेअर्समध्ये झालेली घट या पार्श्वभूमीवर फेसबुकमध्ये लवकरच काही नव्या उपाययोजना पाहायला मिळण्याची शक्यता अनेक व्यवसाय तज्ज्ञ व्यक्त करत होते. अखेर त्याची घोषणा खुद्द मार्क झकरबर्गनेच केली असून, फेसबुकच्या कर्मचाऱ्यांचे त्याने बारसेच करून टाकले आहे. याशिवाय इतर काही गोष्टींसोबतच कंपनीचं ब्रीदवाक्य देखील त्याने बदलून टाकले आहे. काही महिन्यांपूर्वीच फेसबुकच्या मूळ कंपनीचं नामकरण 'मेटा' असे करण्यात आले होते. त्यानंतरचा हा दुसरा मोठा बदल आहे.

कर्मचाऱ्यांच्या नव्या नावासंदर्भात मार्क झुकरबर्गने माहिती दिली आहे. ज्या प्रकारे गुगल आपल्या कर्मचाऱ्यांना गुगलर्स म्हणते, मायक्रोसॉफ्ट आपल्या कर्मचाऱ्यांना मायक्रोसॉफ्टीज म्हणते, तसेच आता मेटाच्या कर्मचाऱ्यांना 'मेटामेट्स' म्हटलं जाईल, असे मार्क झुकरबर्गने जाहीर केले आहे. लवकरच हे बदल लागू केले जातील, असे मार्कने फेसबुक कर्मचाऱ्यांशी बोलताना सांगितले आहे.

दरम्यान, कर्मचाऱ्यांना कशा प्रकारे संबोधले जाईल, यासोबतच मार्कने फेसबुकची मूळ कंपनी मेटासाठी नवीन ब्रीदवाक्याची घोषणा केली आहे. आता मेटाचे नवीन ब्रीदवाक्य 'मेटा, मेटामेट्स अँड मी' असे असेल. हे नवीन ब्रीदवाक्य म्हणजे आपली एकमेकांप्रती आणि कंपनीच्या एकत्रित यशाप्रती असलेली जबाबदारी आहे. आपण कंपनीची आणि एकमेकांची काळजी घेणे, या ब्रीदवाक्यातून प्रतीत होत आहे, असे त्याने जाहीर केले आहे.

# रस्ता एकीकडे तर पाटी भलतीकडे

|| नेरळ ग्रामपरिसरातील अजब प्रकार

|| जनमानसात शंकाकुशंकांना जोर



। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुका पंचायत समितीच्या माध्यमातून बांधकाम विभागाद्वारे अंदाजपत्रकात मंजूर केलेल्या नेरळ पंचायत परिसरातील रस्त्याबाबत जनमानसात शंकाकुशंकांना जोर चढला आहे. कारण रस्ता एकीकडे तर त्याची माहितीदर्शक पाटी भलतीकडे असा अजब प्रकार पाहायला मिळत आहे.

शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या नागरी सुविधा विकास मधून तयार केलेल्या रस्त्याचे मंजूर काम वेगळ्या ठिकाणी, प्रत्यक्ष काम वेगळ्या ठिकाणी आणि रस्त्याच्या कामाची पाटी वेगळ्या ठिकाणी हे काय गौडबंगाल आहे? अशी चर्चा रंगली असून, याबाबत कर्जत पंचायत समितीचे शाखा अभियंता कोणतीही माहिती देण्यास तयार नाहीत.

कर्जत पंचायत समितीच्या माजी सभापती तथा विद्यमान सदस्य सुजाता मनवे यांनी नेरळ ग्रामपंचायत मधील टेपआळी भागात पंचायत समितीच्या सन २०२१-२२ या सेस फंडातील १५ व्या वित्त आयोगातून पेव्हर ब्लॉक रस्त्याचे काम केले आहे. शासनाच्या नागरी सुविधा विकास मधून तब्बल १५ लाख रुपये खर्चून रस्त्याला पेव्हर ब्लॉक लावण्याचे काम मंजूर आहे. नेरळ ग्रामपंचायतीमधील टेपआळी भागातील रस्त्याचे काम शासनाने मंजूर केले होते. १५ लाख रुपये खर्चाचे असलेले हे काम करताना संबंधित ठेकेदाराने रस्त्याचे अंदाजपत्रक ज्या ठिकाणी रस्ता करायचा होता, तेथे न करता अन्य ठिकाणी रस्त्याचे काम केले आहे असा स्थानिकांचा आरोप आहे. तर कामाची पाटी वेगळ्या ठिकाणी हे काय गौडबंगाल आहे याबाबत जोरदार चर्चा सुरू आहे. परंतु मुख्य रस्ता सोडून त्यांनी प्रत्यक्षदर्शी गल्लीतील खराब झालेल्या पायवाटा या पेव्हरब्लॉकचा वापर करून रस्ता सुस्थितीत करून परंतु हे काम पूर्ण झाले आहे.

यानंतर मनवे यांनी स्वतःच्या नावाची म्हणजेच सुजाता दीपक मनवे माजी सभापती तथा विद्यमान सदस्य पंचायत समिती यांच्या सौजन्याने अशी वाक्य असलेली पाटी ही ग्रामस्थांना अडचण होईल अशा रिकाम्या जागेत चौथरा तयार करून लावण्यात आली आहे.

सध्या याच चवथ्याऱ्याच्या नाम फलकावरून गावात वाद निर्माण झाला असून याची चर्चा सध्या नेरळ शहरभर पसरली आहे. पंचायत समितीच्या माजी सभापती राहिलेल्या सुजाता मनवे यांच्या नावाची शहरभर सध्या चर्चा सुरू झाली आहे.त्यांनी केलेले रस्त्याचे काम हे एकीकडे तर कामाच्या नावाचे फलक हे दुसरीकडे लावण्यात आले असून हा फलक येथील स्थानिक नागरिकांना अडचणींचा विषय ठरल्याने याची सध्या शहरभर चर्चा सुरू झाली आहे. ग्रामस्थांना सांस्कृतिक, समाज उपयोगी कार्यक्रम राबवण्यासाठी तसेच बालबच्चे कंपनीला खेळण्यासाठी एकाच मोकळी जागा गावात शिल्लक असताना केवळ आपल्या नावाच्या पाटी साठी आग्रही भूमिका घेणाऱ्या मनवे यांच्या बाबत आता स्थानिक प्रशासन व वरिष्ठ अधिकारी काय भूमिका घेणार हे देखील पाहणे महत्वाचं ठरणार आहे. तर या कामाचे अंदाजपत्रक मंजूर करणारे कर्जत पंचायत समितीचे शाखा अभियंता गुलाबराव देशमुख यांनी त्या कामाबाबत काहीही माहिती देण्यासाठी फोन उचलला नाही.

**लोकप्रतिनिधींची अरेरावी**

**यासंदर्भात ग्रामस्थांनी सामंजस्याने प्रश्न मार्गी लावण्यासाठी मनवे यांच्याशी संपर्क साधला असता अरेरावीची भाषा वापरण्यात आली असून, चवथ्यारा हटवण्यास नकार दिला आहे.**



## आ. जयंत पाटील यांचेकडून बागपाले कुटुंबियांचे सांत्वन

। वाघ्रण । वार्ताहर ।

शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते श्रीधर बाळाराम पाटील उर्फ केसरीनाथ बागवाले यांचे नुकतेच निधन झाले असून, त्यांच्या कुटुंबियांना या दुःखदप्रसंगी मायेचा आधार देण्यासाठी शेकापक्षाचे ज्येष्ठ नेते आ.जयंत पाटील यांनी भेट देत त्यांचे सांत्वन केले आहे.

याप्रसंगी शेतकरी कामगार पक्षाचे अनिल पाटील, ॲड.प्रमोद पाटील, सत्यविजय पाटील उपस्थित होते.

शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते म्हणून नामख्यात असणारे श्रीधर पाटील उर्फ केसरीनाथ बागवाले यांनी विविध संस्थांचे नेतृत्त्व यशस्वीपणे सांभाळले होते. त्यांच्या पश्चात रुपेश पाटील, परेश पाटील ही दोन मुले, पत्नी इंझूमणी पाटील, सुना, नातवंडे याशिवाय अन्य पारिवारिक सदस्य असा मोठा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने फक्त कुटुंबातच नाही तर परिसरातही मोठी पोकळी निर्माण झाल्याची खंत जनसामान्यातून व्यक्त करण्यात येत आहे.

**म ह त्त्वा चे**

### मायलेकरांचे अपहरण

**महाड :** परिसरात लेकरांचे अपहरण झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी साजिद कादरी यांनी तालुका पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली आहे. यानुसार फिर्यादीची मुलगी (३२) आणि तिचे दोन मुलगे सरंवे तुडिल येथून अपहरण करण्यात आले आहे. घटनेतील आरोपी ही वलंग-खैरे आदिवासीवाडी येथील रहिवासी आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास सहा. फौजदार जाधव करीत आहेत.

### कॅन्सर तपासणी शिबिर

**कर्जत :** इनरव्हील क्लब ऑफ कर्जत यांच्या विद्यमाने नर्गिस दत्त फाऊंडेशन आणि अपोलो कॅन्सर सेंटर यांच्या सहकार्याने कर्जत मध्ये मोफत मेघा कॅन्सर तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. रविवार दि.२० फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते ५ या वेळेत किरवली येथील शेळके मंगल कार्यालयात या शिबिराची व्यवस्था करण्यात आली आहे.

## आरोग्यवर्धिनी केंद्रात बाह्यरुग्ण सेवा पूर्ववत

**विविध वैद्यकिय सेवांचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन**



। पनवेल । प्रतिनिधी ।

खारघरयेथीलडीमार्टच्याजवळील नागरी प्राथमिक आरोग्यवर्धिनी केंद्रात कोव्हिड साथरोग आटोक्यात आल्याने बाह्यरूग्ण सेवा पूर्ववत करण्यात आल्या आहेत. तसेच विविध वैद्यकिय सेवांचे उद्घाटन महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल, उपमहापौर सीताताई पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, आयुक्त गणेश देशमुख, नगरसेवक निलेश बावीस्कर प्रभाग 'अ'च्या सभापती संजना कदम, स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर नगरसेविका नेत्रा पाटील, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

या प्राथमिक आरोग्यवर्धिनी केंद्रांमध्ये कोव्हिड साथरोगाची रुग्णसंख्या कमी झाली असल्याने बाह्यरूग्ण सेवा पुर्ववत करण्यात आल्या आहेत.

यामध्ये ओपीडी अंतर्गत डॉक्टर, विशेष तज्ञांकडून सल्ला, प्रसूतीपूर्व सेवांतर्गत दर बुधवारी गरोदर मातांची तपासणी, प्राथमिक उपचार, आपत्कालीन सेवा, सामान्य संसर्गजन्य रोग नियोजन, किरकोळ रोग्यांची बाह्य रूग्णसेवा, टी.बी. कुष्ठरोग, यासारख्या असंसर्गजन्य रोगांची तपासणी, प्रतिबंध नियंत्रण व नियोजन, नवजात अर्भक व नवजात शिशूंसाठी आरोग्य सेवा, लसीकरण, कोव्हिड लसीकरण, समुपदेशन सेवा या अंतर्गत बाल्यावस्था व किशोरवयीन सेवा, कुटूंब नियोजन गर्भनिरोधक व प्रजनन संबंधी इतर आरोग्यसेवा, मानसिक आरोग्य तपासणी, वाढत्या वयातील आजार व परिहारक उपचार, टिळक विद्यापीठाच्या डॉक्टरांच्या माध्यमातून फिजोथेरपी दिली जाणार आहे, तसेच लॅब टेस्ट यामध्ये कंप्लिट ब्लड काऊंट, रक्तातील साखर, थायरॉईड, मलेरिया, डेंग्यू, एचआयव्ही, लिव्हर-किडनी फंक्शन या टेस्ट केल्या जात आहे.

याबरोबरच आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन विविध सर्वेक्षण करतेवेळी नागरिकांनी त्यांना सहकार्य करावे असे आवाहन मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी केले आहे. यावेळी ब्रिजेश पटेल, महापालिकेचे वैद्यकिय अधिकारी, टिळक विद्यापीठाचे फिजीओथेरपी डॉक्टर्स, परिचारिका, आशा वर्कर्स, नागरिक उपस्थित होते.

## उपसरपंचपदी अस्मिता गावंड

। उरण । वार्ताहर ।

तालुक्यातील पिरकोन ग्रामपंचायतीच्या अस्मिता राकेश गावंड यांची निवड झाली. या निवडीनंतर तालुका काँग्रेस अध्यक्ष विनोद म्हात्रे, जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर, सरपंच रमाकांत जोशी, माजी उपसरपंच दिपाली पाटील आदी मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## जेएनपीटी वसाहतीत वाढल्या भुरट्या चोऱ्या

। उरण । वार्ताहर ।

परिसरातील जेएनपीटी बंदर वसाहतीत भूरट्या चोरीच्या घटनांमध्ये दिवसागणिक वाढ होत आहे. यातील महत्त्वाची बाब म्हणजे की, वसाहतीत सुरक्षा रक्षक तैनात असताना या घटना घडत असल्याने, नागरिकांमध्ये नाराजीचा सूर आहे.

जेएनपीटी बंदराच्या कामगारांना बंदराजवळच वास्तव्य करता यावे, यासाठी बंदर प्रशासनाने नवघर व जसखार या ग्रामपंचायत हद्दीच्या मधोमध सुसज्ज, सुविधांनी परिपूर्ण असलेल्या वसाहतीची उभारणी केली. परंतु सदर वसाहतीमधील रहिवाशांच्या घरात घरफोडीच्या, तसेच मौल्यवान वस्तू चोरीस जाण्याच्या घटना घडत आहेत. त्यातच आता भूरट्या चोरीत देखील वाढ झाली आहे.

वसाहतीमध्ये पार्किंग करुन ठेवण्यात येत असलेल्या वाहनातून पेट्रोल चोरीच्या घटना या आत्ता नेहमीच पहायला मिळत आहेत. या वसाहतीमध्ये २४ तास सुरक्षा रक्षक तैनात असताना देखील हे प्रकार वाढत चालले आहेत.

याबाबत सुरक्षा रक्षकांनी नाव न छापण्याच्या अटीवर सांगीतले की, आम्ही आमचे काम प्रामाणिकपणे करत आहोत. परंतू वसाहतीचा पसारा मोठा आहे त्यामूळे जर काही ठिकाणी भूरट्या चोऱ्या झाल्या असतील तर त्याबाबत नागरिकांनी पोलिसांकडे तक्रार दाखल करायला हवी. त्यातून वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही कोणतीही कसर न ठेवता आमचे काम करु.

## पार्क केलेल्या चारचाकींचे टायर, बॅटरींची चोरी

**पोयनाड पोलीस ठाणे हद्दीत चार घटना**

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील पोयनाड परिसरात वेगवगेळ्या चार ठिकाणी अज्ञात चोरट्याने पार्किंग करुन ठेवलेल्या चार चाकी वाहनांचे टायर, बॅटरी अशा साहित्य काढून नेण्याच्या घटना घडल्या आहेत. चार वेगवेगळ्या घटनांप्रकरणी पोयनाड पोलीस ठाण्यात एकच गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतचे वृत्त असे की, पोयनाड पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ११ ते दि. १२ फेब्रुवारी या दरम्यान मौजे




सांबरी गावचे हद्दीत मुंढाणी बेणसे ता.पेण यांची स्वीफ्ट डिझायर कार (नं. एम एच ०३ सी पी ६८९६) ही सांबरी गावचे हद्दीत पार्कींग करून रोड लगत ठेवली असता अज्ञात चोरट्याने कारचे मागील दोन जे के कंपनीचे टायर डिक्ससह खोलून नेले. तसेच अजय एकनाथ तोरणकर यांची टाटा मॉक्झिमो (गाडी नं एम एच १२ एफ डी ५११०) ची एक ईमार्क कंपनीची बॅटरी, उमेश गजानन भिसे टाटा जीप (गाडी नं एम एच ०६ बी डब्लु २०६२) ची एक एक्साईड कंपनीची बॅटरी, अनिल राजु माने टाटा इंन्ट्रा गाडी (एम एच ०६ बी डब्लु ५४८०) ची एक एक्साईड कंपनीची बॅटरी सर्व राहणार नामदेवनगर पोस्ट पोयनाड असा एकूण हजारो किमतीचा माल काढून चोरुन नेला.

## मांडला येथे करियर गाईडन्स

। अलिबाग । वार्ताहर ।

नेहरु युवा केंद्र संघटन, रायगड -अलिबाग आणि ओएसिस : बहुउद्देशीय समाजाभिमुख संस्था, रेवदंडा, अलिबाग-रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने मुरुड तालुक्यातील मांडला ग्रामपरिसरात करियर गाईडन्स कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, याअंतर्गत नागरी सेवा विषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. श्रीगणेश मंदिर सभागृहात स. ११ वाजता हा कार्यक्रम सुरु होणार आहे. तरी अधिकाधिक सहभागाचे आवाहन करण्यात आले आहे.

## चुलत दिराची वहिनीवर वाकडी नजर

**गैरवर्तन लपविण्यासाठी धमक्यांचा आधार**

। महाड । वार्ताहर ।

चुलत दिराची वहिनीवर वाकडी नजर असल्याने, या पार्श्वभूमीवर आरोपीकडून करण्यात आलेल्या गैरवर्तनाचा खुलासा पिडीतीने करू नये, म्हणून सातत्याने तिला धमक्या दिल्या आहेत.

महाड तालुक्यातील वहुर बौद्धवाडी परिसरात पिडीता आणि आरोपी नात्याने चुलत वहिनी आणि दिर असून, ते शेजारी राहतात. दरम्यान, या दिराची वहिनीवर वाकडी नजर असून, वेगवेगळी कारणे देत तो पिडीतेच्या घरात घूसला व तिच्यासह गैरवर्तन केले. तसेच याबाबत वाच्यता केल्यास नवरा आणि मुले यांना घातपात करण्याची धमकी आरोपीने पिडीतेला दिली.

याशिवाय वेळीच या गैरवर्तनाला आळा न बसल्याने अश्लील मॅसेज पाठवत, तिच्यावर शरीर सुखासाठी दबाब टाकला. आणि जीवे मारण्याची धमकी दिली. दिराचे हे वर्तन जेव्हा असह्य झाले, तेव्हा पिडीतेने महाड शहर पोलीस ठाण्यात धाव घेत फिर्याद दिली. यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास पोलीस हवालदार लांगे करीत आहेत.

## महिलेला जीवे मारण्याचा प्रयत्न

**रेवदंडा :** चौलभोवाळे येथे पूर्ववैमन्यातून जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला असून, हा प्रयत्न फसल्याने मारहाण करण्यात आली आहे. याबाबत रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेतील आरोपी आणि साक्षीदार यांच्यातील जुन्या भांडणाचा राग मनात ठेवून आरोपींनी साक्षीदार हिच्यासोबत गैरवर्तन करत, हातातील टॉवेल तिच्या गळ्याभोवती गुंडाळला आणि गळा आवळत जीवे मारण्याचा प्रयत्न केला.

### प्रकल्पग्रस्तांच्या प्रतीक्षेची उपेक्षा

## स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात भूखंडापासून वंचित

। उरण । वार्ताहर ।

नवी मुंबई शहर प्रकल्पासाठी शेतकर्यांच्या जमिनी संपादित करण्यात आलेल्या घटनेला आज ५० वर्षांपेक्षा जास्त कालावधी झाला. प्रकल्पग्रस्तांना राज्य शासनाने अतिरिक्त नुकसानभरपाई देण्यासाठी लागू केलेल्या साडेबारा टक्के योजनेलादेखील २८ वर्षे झाली. साडेबारा टक्के योजनेतील विकसित भूखंडांची वाट पाहत आता दुसरी पिढीदेखील काळाच्या पडद्याआड जाऊ लागली आहे. तरीही द्रोणागिरी येथील ११०० प्रकल्पग्रस्तांना अद्याप या योजनेतील जमिनीचा तुकडा मिळालेला नाही.

हक्काचे भूखंड मिळावेत यासाठी द्रोणागिरी प्रकल्पग्रस्त दररोज सिडको मुख्यालयात पायताणे झिझवत आहेत. मात्र दुर्लक्ष होत असल्याने आता या प्रकल्पग्रस्तांनी आता थेट मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना साकडे घालून हक्काचे भूखंड मिळवून देता का अशी आर्जवे केली आहेत.

सिडकोने बेलापूर, पनवेल, उरण या तीन तालुक्यांतील १६ हजार हेक्टर खासगी जमिनी संपादित केल्या आहेत. दोन जिल्हे व तीन तालुक्यांतील ५९ हजार लाभार्थींना या योजनेअंर्तगत भूखंड देण्याची कार्यवाही ९२ टक्के पूर्ण झाल्याचा दावा सिडकोने केला आहे. शिल्लक आठ टक्के दावे हे वादविवाद व न्यायालयीन प्रक्रियेत अडकल्याचे अनेक वेळा सिडकोच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे. मात्र एकटया द्रोणागिरी येथील ३६५ प्रकल्पग्रस्त कुटुंबांतील सुमारे ११०० संचिका या नुकसानभरपाईच्या प्रतीक्षेत गेली १४ वर्षे आहेत. तर या भागात भूखंड देण्यास जमीनच शिल्लक नसल्याचा कांगावा सिडको करीत आली आहे.

**भूमापन अधिकारी व्यग्र**

नवी मुंबई शहर प्रकल्पासाठी जमिनी देणाऱ्या प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या कागदपत्रांची पूर्तता व छाननी झाल्यानंतर पात्रता जाहीर करण्याची जबाबदारी या योजनेसाठी राज्य शासनाकडून नियुक्त करण्यात आलेले मुख्य भूमी व भूमापन अधिकाऱ्यांची आहे. विद्यमान भूमी व भूमापन अधिकारी अजिंक्य पडवळ यांच्या खांद्यावर सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांच्या विशेष कार्य अधिकारी पदाची देखील जबाबदारी आहे. त्यामुळे ते नेहमीच व्यग्र असल्याचे चित्र आहे. त्यामुळे शिल्लक साडेबारा टक्के योजनेची पूर्तता करण्यासाठी या विभागाला पूर्णवेळ अधिकारी नसल्याने अनेक प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के विभागात साहेब नाहीत या सबबीखाली हात हलवत परत जावे लागत आहे.


## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- विवाह, पुर्नविवाह सर्वजातीय आंतरजातीय स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ. ८८८८९३५७७५, ९२७०४३३४८७
- अलिबागमधील ऑफिसकरिता आर्किटेक्ट, इंटिरियर डिझायनर आणि ड्राफ्ट्समन पाहिजे. मोबाईल नंबर- ८००७४५२१४६
- ॲडव्हान्स लेव्हल शेअर मार्केट कोर्स,Investomax कामत आळी, अलिबाग- ७७४४०८८४०४
- अलिबागमध्ये ११८३ Sqft फ्लॅट विकणे आहे. संपर्क : ९६८९७६७७०७
- अलिबागमध्ये हार्डवेअरच्या दुकानात कामासाठी मुले पाहिजेत. संपर्क- ०२१४१-२९५१११/९४२२६९०८५४

जाहिरातीसाठी संपर्क

☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


## कोपरा गार्डनमुळे पडणार कर्जतच्या वैभवात भर

**स्वच्छ भारत अंतर्गत बक्षिसाचा निधी सत्कारणी; शहरात २५ ठिकाणी कोपरा गार्डनची उभारणी**

। नेरळ । वार्ताहर ।

रायगड जिल्ह्यातील स्वच्छतेच्या बाबतीत आघाडीवर असलेले कर्जत शहर नव्याने उपक्रम राबवित असलेल्या कोपरा गार्डनमुळे कर्जतच्या वैभवात आणखी भर पडणार आहे. कर्जत नगरपरिषदेला स्वच्छ भारत मधून मिळालेल्या बक्षिसाच्या रकमेतून शहरात २५ ठिकाणी कोपरा गार्डन विकसित केले आहेत. दरम्यान कर्जत नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सुवर्णा जोशी आणि पालिका मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांच्या संकलपनेतून कर्जत शहरात कोपरा गार्डन ही संकल्पना राबविली जात आहे.

कर्जत ही रायगड जिल्ह्यातील जेमतेम २० वर्षे वयोमान असलेली वर्ग नगरपरिषद आहे. राज्य सरकारच्या मुंबई महामनगर प्रदेश विकास प्राधिकरणामधून या शहरातील रस्ते काँक्रीटचे झाले आणि त्यानंतर बैठ्या चाळींच्या आणि वाडे असलेल्या या शहरातील रूप पालटले आहे. पालिकेची अद्ययावत इमारत उभी राहिल्यानंतर कर्जत शहरात नागरी स्वच्छता अभियान आणि त्यानंतर स्वच्छ सर्वेक्षण अभियान मध्ये केलेल्या कार्यामुळे कर्जत शहराचे रूप पालटले होते.

यानंतर सातत्याने कर्जत नागरपरिषदेला पुरस्कार मिळत राहिले आणि त्या पुरस्कारांची रक्कम आता कर्जत शहराच्या वैभवात भर घालण्यासाठी कर्जत नगरपरिषद करीत आहेत. त्या माध्यमातून कर्जत शहरात २५ ठिकाणी कोपरा गार्डन विकसित केली जात आहेत. जेणेकरून शहराचे रूप आणखी विहंगम दिसावे यासाठी हे सर्व केले



जात असून कर्जत शहरात नगराध्यक्ष सुवर्णा जोशी आणि मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील तसेच उपनगराध्यक्ष आणि सर्व सदस्य यांनी पालिकेच्या कर्मचारी यांना सोबत घेऊन नवीन उपक्रम यशस्वी केला आहे.

कर्जत शहरात विविध २५ ठिकाणी स्वच्छ भारत अभियान मधून कोपरा गार्डन विकसित केले जात आहेत. त्या कोपरा गार्डनची रचना ही जांभा दगड वापरून बांधले आहेत. त्या बांधकामावर काही ठिकाणी म्युरल्स तर काही ठिकाणी स्टॅच्यू उभारले जाणार आहेत.त्यातील ८ कोपरा गार्डनचे लोकार्पण केले जात आहे. त्याचवेळी शहरात अन्य ठिकाणी कोपरा गार्डनची कामे अंतिम टप्प्यात आहेत. शहरात या कोपरा गार्डन उभारण्यासाठी एक कोटी रुपयांचा निधी खर्च केला जाणार आहे. या कोपरा गार्डनच्या माध्यमातून शहराचे रूप पालटणार आहे. त्या कोपरा गार्डन वर दोन ठिकाणी आय लोव्ह कर्जत, तसेच काही ठिकाणी पंढरपूर पायी वारी, छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक, छत्रपती संभाजी महाराज, पारंपरिक संस्कृती, भगवान गौतम बुद्ध, समता बंधूभाव, शेतकरी, तीन माकडे अशी म्युरल्स आणि स्टॅच्यु उभारले जात आहेत. कर्जत शहरात पूर्ण झालेल्या आठ कोपरा गार्डनचे लवकरच लोकार्पण होणार आहे. त्यात कर्जत शहरात प्रवेश करणारी भिसेगाव खिंड, भिसेगाव मधील गजानन महाराज मंदिर, मुद्रे, कोतवाल नगर, महावीर पेठ, दिवाणी न्यायालय, दहिवली डोंबे हायस्कुल, दहिवली लहान पूल, पाटील आळी अशा ठिकाणची कोपरा गार्डन तयार असून लोकार्पणासाठी सज्ज आहेत.

# फॉरेन्सिक सायन्सकडे करिअर म्हणून पहावे

## डॉ. साक्षी पाटील यांचे प्रतिपादन



**। अलिबाग । शहर वार्ताहर ।**

फॉरेन्सिक सायन्स हा अलीकडच्या काळातील न्याय तपास प्रक्रियेतील एक आवश्यक भाग असल्याचे सांगून, फॉरेन्सिक सायंटिस्ट क्रिमिनल केसमधील पुराव्यांचा वैज्ञानिक अभ्यास करतात आणि गुन्ह्याच्या जागेची पाहणी करून पुराव्यांची चौकशी व तपासणी करतात असे प्रतिपादन डॉ. साक्षी गौतम पाटील यांनी केले.

जे. एस. एम. कॉलेजच्या नेचर क्लब तसेच प्राणीशास्त्र विभागातर्फे फॉरेन्सिक सायन्स या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी जनता शिक्षण मंडळाच्या उपाध्यक्ष व अलिबाग येथील कोकण एज्युकेशन सोसायटीच्या चंद्रकांत हरी केळुस्कर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजमधील प्राध्यापक डॉ. साक्षी पाटील या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या.

जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. फॉरेन्सिक सायन्स या सारख्या नाविन्यपूर्ण विषयांची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी, त्यामधून असलेल्या नोकरीच्या संधींबद्दल जाणीव जागृती व्हावी, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन केल्याची माहिती महाविद्यालयाच्या नेचर क्लबच्या प्रमुख डॉ. मिनल पाटील यांनी दिली. यावेळी प्राणिशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. अद्वैत घाटपांडे, प्रा. सुनील आनंद तसेच विज्ञान विषयाचे विद्यार्थी, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वैद्यकीय क्षेत्राबरोबरच फिजिकल सायन्ससारख्या केमिस्ट्री, फिजिक्स आणि बायोलॉजी या विषयांचा फॉरेन्सिक सायन्समध्ये अंतर्भाव होत असल्याने विद्यार्थ्यांना यामधून नोकरीच्या संधी उपलब्ध होऊ शकत असल्याचे डॉ. साक्षी पाटील यांनी पुढे सांगितले. फॉरेन्सिक मेडिसिन अँड टॉक्सिकोलॉजी विभागाच्या प्रमुख असलेल्या डॉ. साक्षी पाटील यांनी फॉरेन्सिक सायन्स या फार परिचित नसलेल्या विषयाची माहिती विद्यार्थ्यांना अत्यंत सोप्या भाषेत दिली.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन



१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**मुख्य संपादक**

---

प्रो. जमा रुपये १००/- अर्जदाराचे वकील :- ॲड. सतिश दत्ताराम पाटील
ने.तारीख :- १०-०२-२०२२

### जाहीर नोटीस

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्याया. क. स्तर सो. यांचे कोर्टात**
**दिवाणी चौकशी अर्ज नं. १३८/२०२१**
नि.६/ड

**१. श्रीम. सानिका सागर शिंदे**
वय- ४० वर्षे, धंदा- काही नाही,
**२. कु. निर्वेध सागर शिंदे**
वय-१७ वर्षे, धंदा- शिक्षण, ...अर्जदार
दोघेही, मु. घर क्र. २०६, बंदरआळी, कळवे,
पो.जोहे, ता. पेण, जि. रायगड. ४०२१०७
मोबा. नं. ७८८८००९१८०
विरुद्ध
कोणीही नाही. ...सामनेवाले

भारतीय वारसा कायदा कलम ३७२ नुसार
वारस दाखला मिळणेकरीता

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,
१) अर्जदार क्र. १ व २ यांनी मयत कै.सागर किसन शिंदे हे दि. २२-१०-२०२१ (बावीस ऑक्टोबर दोन हजार एकवीस) रोजी अलिबाग येथे मयत झाले.
२) त्यांचा कायदेशीर वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार हिने अलिबाग येथील दिवाणी न्यायाधीश 'क' स्तर यांचे कोर्टात दिवाणी चौ.अर्ज नं. १३८/२०२१ हा दिनांक २१-१२-२०२१ रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जात वारसांचे दाखल्याबाबत अन्य कोणाचे हक्क, अधिकार व हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास त्याची लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात दाखल करावी. वरील चौकशी अर्जास कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. सदरहू नोटीस ही आज दिनांक ३१-०१-२०२२ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क. लिपीक** **दि. न्या.व स्तर, अलिबाग** (कोर्टाचा शिक्का) **सही/-** **सह. अधिक्षक** **दि.न्या.व स्तर, अलिबाग**

---

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे कामार्ले, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. २४२, क्षेत्र २ हेक्टर ४८ आर (पोटखराब्यासहीत), आकार २ रूपये ३७ पैसे पैकी २ हे. २४ आर, आकार २ रूपये ०२ पैसे या वर्णनाच्या जमिन मिळकतीचे एकमेव मालक व भोगवटादार श्री. लालचंद गंगाधर पाटील यांनी सदर मिळकतीसंदर्भातील खाली दिलेल्या अनुसूचित नमूद केलेला मुळ दस्तऐवज हा एकतर हरवला आहे किंवा गहाळ झालेला आहे व त्याचा शोध लागत नाही, असे प्रतिपादन आमचे अशिलांकडे केलेले आहे. सदर मिळकतीचे एकमेव मालक म्हणून श्री. लालचंद गंगाधर पाटील यांनी अशी खात्री दिली आहे की, त्यांनी तो मुळ दस्तऐवज कोणत्याही व्यक्तीकडे/व्यक्तींकडे किंवा आस्थापनेकडे 'सदर मिळकत' जामीन ठेवण्याच्या उद्देशाने जमा केलेला नाही.

ज्या कुणा व्यक्तीचा अथवा व्यक्तींचा सदर मिळकतीमध्ये अथवा त्यातील कोणत्याही भागावर वाडवडिलार्जित वारसहक्क, गहाण, विक्री, बक्षिस, दान, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, बेचनपत्र (असाईनमेंट), कुळ हक्क, भाडेकरूपणाचा हक्क, अदलाबदल, मृत्यूपत्राद्वारे हक्क, वारसाहक्क, लिएन, बोजा, विश्वस्त, पोटगी, अन्न-वस्त्राचा हक्क, इजमेंट (सुविधाधिकार), व्यवस्थापन, जप्ती, परवानाधारक, तारण, कर्ज, हातउसनवारी, न्यायालयाचा हुकूमनामा अथवा आदेश, कंत्राट, करारपत्र या अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असेल आणि / किंवा अशा हक्कांमुळे किंवा अन्य कारणास्तव सदर मिळकतीसंदर्भातील मुळ दस्तऐवज त्यांचे ताब्यात असेल तर त्यांनी सदरची बाब या नोटीसीच्या प्रसिद्धी दिनांकापासून ७ (सात) दिवसात ज्या दस्तऐवजांच्या आधारे ते असा हक्क सांगू इच्छित आहेत त्या संबंधीत मुळ दस्तऐवजाच्या प्रतीसह खाली नमूद केलेल्या आमच्या पत्त्यावर लेखी कळवावे, मुदतीत कुणाकडूनही तसे कळविण्यात न आल्यास कुणाच्याही ताब्यात सदरचा मुळ दस्तऐवज नाही व कुणाचाही, कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो सोडून देण्यात आला आहे, असे गृहित धरण्यात येईल.

अनुसूची
(मुळ दस्तऐवजाची यादी)
श्री. गंगाधर शांताराम पाटील व श्रीमती. लिलाबाई दौलतगिरी गोसावी यांचेमध्ये स्वाक्षरीत झालेले दिनांक २४/६/२००८ रोजीचे व दुय्यम निबंधक अलिबाग यांचे कार्यालयात दस्त क्र. ३२३५/२००८ कडे नोंदविण्यात आलेले खरेदीखत.

अलिबाग सही/-
तारीख : १७/२/२०२२ **ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे मिळकतीचे वर्णन :-तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका उरण रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती उरण येथील खालील वर्णनाच्या शेतमिळकत :-

**मौजे- चाणजे, ता. उरण, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | शेतकऱ्यांचे नाव | एकूण क्षेत्र | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| ३३५/१ | बद्रुन्निस्सा महंमद जुअेब पठाण व इतर | ०-४९-१० | १२.२० |

वर नमूद केलेली मिळकत ही वरील कब्जेदाराच्या मालकी हक्कात व कब्जे वहिवाटीत आहे व त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना कायमची फरोक्त खरेदी देण्याबाबत वाटाघाट चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध असल्याबद्दल विद्यमान मालकांने सांगितले आहे. सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसलाही कुळ, वहिवाट, ताबाकब्जा, बयाणा पावती, वचनचिठी, साठेकरार, खरेदीखत, कुळमुखत्यार पत्र, विकसित करण्याबाबतचा करार, गहाण, बोजा, पोटगी, चार्ज, मॉर्टगेज, संपादन भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, कर्ज, लिज, तबदील, ट्रस्ट, वारसा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार आमचे अशिलांचे वकील यांच्याकडे आपल्या पत्त्यावर पोष्टाने अथवा प्रत्यक्ष संपर्क साधून कायदेशीर पुराव्यांसह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात.

याप्रमाणे ठरलेल्या मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहित धरुन, तसेच त्यासंबंधी कोणाचेही, कोणतेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरण्यात येईल. तसेच मागाहून येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात घेतलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण :- उरण **ॲड. उमेश लक्ष्मण शिंदे**
दिनांक :- १७-०२-२०२२ मो. ९८२०६२६९००
ऑफीस पत्ता - शॉप नं. ९०५-९०८,
शेल्टॉन क्युबीक्स, प्लॉट नं. ८७, सेक्टर १५,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४
ऑफीस फोन नं. ०२२ ४९७०९७८९

---

**अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात**
**जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग, जि. रायगड**
क्रमांक/आरटीएस/अपील क्र. २७५/२०२१

१ श्री. काशिनाथ गोटीराम पवार
मु. वयाळ, पो. वाशिवली, ता. खालापूर, जि. रायगड } अपिलार्थी
विरुद्ध
१ श्रीम. निर्मला युवराज बाविस्कर
१/१ श्री. नागेश युवराज बाविस्कर
१/२ श्री. संघमित्रा निलेश भोईर, दोघेही रा. चौक, ता. खालापूर, जि. रायगड
१/३ श्रीम. रजनी अविनाश कांबळे, मु. माजगांव, ता. खालापूर, जि. रायगड
२ श्रीम. उज्वला अनंता सोनावणे, मु. चावंढळ, पो. गुळसुंदे, ता. पनवेल, जि. रायगड
३ श्री. प्रकाश रामचंद्र गायकवाड
४.श्री. अंकुश रामचंद्र गायकवाड
५. श्री. किशोर रामचंद्र गायकवाड
६. श्री. नरेश रामचंद्र गायकवाड
७. श्रीम. शारदा भगवान गायकवाड } उत्तरार्थी
८. श्री. प्रदीप भगवान गायकवाड
९. श्री. प्रविण भगवान गायकवाड
१०. श्रीम. निराबाई रामचंद्र गायकवाड
११ श्री. सुहास रामचंद्र पटवर्धन
१२ श्री. मोहन रामचंद्र पटवर्धन, अ.क्र. ३ ते १२ रा. वयाळ, पो. वाशिवली, ता.खालापूर, जि. रायगड
१३. श्रीम. वैशाली विकास कोरे, रा. वडघर, ता. पनवेल, जि. रायगड
१४. तहसीलदार खालापूर
१५ तलाठी सजा वयाळ, मु. वयाळ, ता. खालापूर, जि. रायगड
१६ मंडळ अधिकारी चौक, मु.पो. चौक, ता. खालापूर, जि.रायगड

महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार अपील या जाहीर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे वयाळ, ता. खालापूर, जि. रायगड येथील सर्व्हे नं./हिस्सा नं. २३/०, ७/क, ७/क, ७/ड, ३७/० या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी या न्यायालयात दि. ०३-११-२०२१ रोजी अपील दाखल केले आहे. सदर अपीलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपीलामध्ये दि. २३-०२-२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे न्यायालयात सुनावणी निश्चित करणेत आलेली आहे. तरी आपण स्वत: अगर तुमचे वकिलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास आपले गैरहजेरीत अपीलाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग सही/-
दिनांक :- १४-०२-२०२२ अपर जिल्हाधिकारीकरीता

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली सदनिका मिळकत आमचे अशिल कुल सेकर सुधा रा.एस.के. राजा, ३/३९० अब्दुलकलाम नगर, वाल्लम (पार्ट), तिरुनेलवेली, तामिळनाडू-६२७८०९ यांनी कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

सदनिका धारक १) श्री. राजेश अनंत जाधव, २) सोनम राजेश जाधव दोघेही रा. हालिवली, ता. कर्जत, जि. रायगड-४१०२०१, यांच्या मालकीची मौजे डिकसळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील सदनिका मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

इमारतीचे नाव- तुळसीछाया, ए विंग ३ रा मजला सदनिका क्र. ३०३ एकूण क्षेत्र २९, १०३ चौ.मी. कारपेट+बाल्कनी क्षेत्र २.४३० चौ.मी.

तरी वरील सदनिकेबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा-कब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी हक्क, मृत्युपत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

तारीख : १७/२/२०२२ **ॲड. कल्याणी रवी गायकर**
पत्ता- प्रेमसिंधु अपार्टमेंट,
कोतवालनगर-कर्जत, जि. रायगड
मो.नं. ८४४६१४८७८१

---

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल श्री. बैसील ऑगस्टीन पेरुमबुल्ली यांच्या मालकीची मौजे वेश्वी येथील उत्कर्षा-उर्वशी को.ऑप. हौसिंग सोसायटी मधील फ्लॅट नं. ५ वेश्वी ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ३५२/५ ही सदनिका मिळकत आहे. सदर सदनिका मिळकतीचे श्री. एकनाथ आत्माराम लोंढे व श्री. दत्तात्रेय मुकुंद जोशी यांच्यामध्ये झालेला दस्त क्रमांक १४१७/१९९४ तसेच श्री. दत्तात्रेय मुकुंद जोशी व श्री.ए. गुरुनाथन यांच्यामध्ये झालेला दस्त क्रमांक ४२१९/२००७ सदरील दोनही मुळ दस्त वरील व्यक्तींकडून घेण्याचे राहून गेले अथवा ते त्यांच्याकडून हरविले आहे. मी वर नमुद मिळकत विकत घेतेवेळी सदर खरेदीखत गहाण ठेवून त्या मिळकतीवर बिल्डर अथवा कोणत्याही बँकेकडून/पतसंस्थेकडून/वित्तीय संस्थेकडून कर्ज काढलेले नाही. याची खात्री केली होती.

मिळकतीचे वर्णन- मौजे वेश्वी येथील स.नं. २०/२ अ, प्लॉट नं. १९ या मिळकतीवर बांधलेल्या उत्कर्षा-उर्वशी-को-ऑप. हौसिंग सोसायटी मधील फ्लॅट नं. ५ वेश्वी ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ३५२/५ ही सदनिका मिळकत.

मात्र तरी देखील वर नमूद केलेल्या मिळकतीवर खरेदीखताच्या मूळ दस्ताच्या आधारे कोणाचाही विक्री, गहाण, दान, बोजा, बक्षिस, लिज, लीएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा सदरचा मूळ दस्त यांच्या ताब्यात असल्यास त्यांनी त्याची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत खाली दिलेल्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात कळवावी.

अलिबाग सही
दि. १७/०२/२०२२ **ॲड. सौ. गौरी गिरीश म्हात्रे**
१०३, पहिला मजला,
ओम चिंतामणी चेंबर्स,
बँक ऑफ इंडिया जवळ
बालाजी नाका अलिबाग-रायगड
मो.नं. ९२७१७७५२७७

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, मौजे- वांजळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली प्लॉट मिळकत आमचे आशिलांनी कब्जेदारांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर प्लॉट मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे वांजळे कर्जत जि. रायगड येथील प्लॉट मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | स.नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| श्री.डॉमनिक फ्रँक डसा | १७६ | ९ | ४४१-८० | ४४.१८ |

सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्कीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
तारीख : १७-०२-२०२२ खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
मो.नं. ८००७८३७६५६ **ॲड. महेश कमलाकर थोरवे**
मु. अंजप, ता. कर्जत, जि. रायगड

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत, विकत घेण्याची ठरविलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे- सातिर्जे, ता. अलिबाग येथील मिळकतीचे वर्णन :**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १)सातिर्जे, ता. अलिबाग | ५८/३ | ०-३४-५० पो.ख.०-०२-५० एकूण ०-३७-०० | ५.७६ |
| २) सातिर्जे ता.अलिबाग | ५९ | ०-०९-०० पो.ख. ०-०३-०० एकूण ०-१२-०० हे.आर. | ०.२२ |

या मिळकतीपैकी क्षेत्र. ०-०३-०० हे.आर.

या मिळकती १) अपर्णा आदेश खडपे, २) अमोद आदेश खडपे व ३) अमित आदेश खडपे यांच्या सामाईक मालकी व ताबे कब्जाच्या आहेत असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ वरुन तसे दिसते. सदरहु मिळकती त्यांचेकडून आमचे अशिलांनी तद्ंगभूत सर्व हक्कांगासह कायम फरोक्त घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. तरी सदरहू मिळकतींत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, साठेकरार, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र वगैरे प्रकारचा हक्क वा कुळ हक्क, अन्न, वस्त्र, बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकती निर्वेध असल्याचे समजून फरोक्तखत रजिस्ट्रर केले जाईल व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

अलिबाग. ॲड. विजय अनंत पेढवी
दिनांक :- १६-०२-२०२२ श्रीकृपा, मु. नांदाईपाडा, पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९८२२१८६७४०

---

## जाहीर सूचना

**(सर्व कायदेशीर अथवा न्यायालयीन विवादासाठी या आदेशाचा इंग्रजी अनुवाद अधिग्राह्य धरण्यात येईल.)**

**वनजमीन- रायगड, ठाणे आणि मुंबई उपनगर 400 के.व्ही. खारघर-विक्रोळी ट्रान्समिशन लाईनकरीता 57.5092 हे. वनजमीन वळती करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन आदेश क्रमांक:एफएलडी-1314/प्र.क्र.240/फ-10, मंत्रालय, मुंबई-400 032.**

दिनांक : 08.02.2022

**संदर्भ:-**
1) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. डेस्क-17/एनसी/॥/आयडी-12354/(55)/1247/14-15, दि. 22.10.2014
2) महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन, पत्र क्र. एफएलडी-1314/ प्र.क्र.240 / फ-10, दि.09.01.2015
3) प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर यांचे पत्र क्र.6-एमएचए-02/2015-बीएचओ/225, दि.14.08.2015, क्र.6-एमएचए-02/2015-बीएचओ/619, दि.07.07.2016
4) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. डेस्क-17/एनसी/॥/आय डी-12354/(55)/762/2018-19, दि.02.07.2018, क्र.डेस्क-17/एनसी/॥/आयडी-12354/(55)/1456/2018-19, दि.22.10.2018
5) प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर यांचे पत्र क्र.6-एमएचए-02/2015-बीएचओ/4571, दि.08.11.2018
6) प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर यांचे पत्र क्र.6-एमएचए-02/2015-बीएचओ/7471, दि.13.11.2020
7) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-17/नोडल/आय डी -12354 (55)/1661/2020-21, दि.01.12.2021.

**आदेश :-**

ज्याअर्थी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भीय पत्र क्र. 1 अन्वये 400 के.व्ही. खारघर-विक्रोळी ट्रान्समिशन लाईनकरीता 57.5092 हे. वनजमीन वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत वळती करणेबाबतचा प्रस्ताव राज्य शासनास केला आहे;

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाने संदर्भीय पत्र क्र.2 अन्वये सदर प्रस्ताव केंद्र शासनास सादर केला होता;

आणि ज्याअर्थी, केंद्र शासनाने या प्रस्तावावर विचार करून, संदर्भीय पत्र क्र.3 अन्वये सदर प्रकल्पासाठी वन (संवर्धन) अधिनियम, 1980 च्या कलम-2 अंतर्गत 57.5092 हे. वनजमीन वळती करण्यास काही अटींसह तत्वत: मंजूरी दिलेली आहे;

आणि ज्याअर्थी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भीय पत्र क्र. 4 अन्वये त्या अटींचा पूर्तता अहवाल केंद्र शासनास केला आहे;

आणि ज्याअर्थी, प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर यांनी संदर्भीय पत्र क्र. 5 अन्वये 400 के.व्ही. खारघर-विक्रोळी ट्रान्समिशन लाईनकरीता 57.5092 हे. वनजमीन वळती करण्यास अंतिम मान्यता दिली आहे;

आणि ज्याअर्थी, प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर यांनी संदर्भीय पत्र क्र. 6 अन्वये प्रकल्प यंत्रणेचे नाव मे. टाटा पॉवर कंपनी लि. ऐवजी खारघर-विक्रोळी ट्रान्समिशन प्रा.लि. असे करण्यास मंजूरी दिली आहे.

आणि ज्याअर्थी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भीय पत्र क्र. 7 अन्वये प्रस्तुत प्रकरणी वनजमीन वळतीकरणाचे आदेश निर्गमित करण्याची राज्य शासनास विनंती केली आहे;

म्हणून आता महाराष्ट्र शासन याद्वारे असे निर्देश देत आहे की, प्रकल्प यंत्रणा म्हणजेच खारघर-विक्रोळी ट्रान्समिशन प्रा.लि. यांना खारघर-विक्रोळी ट्रान्समिशन लाईनकरीता खाली दिलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेली आणि संदर्भीय पत्र क्र. 1 अन्वये सादर केलेल्या प्रकल्प प्रस्तावात अधिक तपशीलात नमूद केलेली ज्यामध्ये, राखीव वन/राखीव वन (कंदळवन)/संरक्षित वन/ खाजगी संपादित वन समाविष्ट आहे, अशी एकूण 57.5092 हेक्टर वनजमीन वळती करण्यात यावी.

सदर वळतीकरण भारत सरकारच्या दि. 14.08.2015, दि.07.07.2016, दि.08.11.2018, दि.13.11.2020 रोजीच्या पत्रांतील अटी व शर्तीच्या तसेच खालील अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून करण्यात यावे;

1. प्रकल्प यंत्रणा भारत सरकारच्या तत्वत: मान्यता व अंतिम मान्यतेच्या पत्रातील तसेच या आदेशातील सर्व अटींचे अनूपालन करेल. प्रकल्प यंत्रणा सर्व अटींचे तंतोतंत अनुपालन करेल याची मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे हे खात्री करतील व याबाबतचा अहवाल वेळोवेळी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सादर करतील.
2. वन (संवर्धन) अधिनियम, 1980 व त्याअंतर्गत केलेले नियम आणि मार्गदर्शक सूचना, भारत सरकारच्या दि.14.08.2015, दि.07.07.2016, दि.08.11.2018 आणि दि.13.11.2020 रोजीच्या पत्रांतील अटी आणि या आदेशातील अटींपैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न करणे हे वन (संवर्धन) अधिनियम, 1980 चा भंग ठरेल आणि त्याप्रमाणे याबाबत वैधानिक कारवाई करण्यात येईल.
3. मा. उच्च न्यायलयाच्या परवानगीनंतरच कांदळवन वृक्षांची तोड करता येईल.
4. उपरोक्त अटींपैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न केल्यास हे मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनातील तरतूदीनुसार राज्य शासनामार्फत प्रादेशिक अधिकारी, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर यांना सादर करतील.

**अनुसूची**

| गाव/तालुका | स. नं/ग.नं./न.भू.क्र. | वैधानिक दर्जा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | राखीव वन | राखीव वन (कांदळवन) | संरक्षित वन | खाजगी संपादित जागा |
| खारघर/पनवेल | 422 (जुना), 457 (नवीन) | 11.7116 | – | – | – |
| शाहबाज/ठाणे | 460/C | – | – | 3.8456 | – |
| शाहबाज/ठाणे | 92pt,100pt,101pt, 114pt,128pt. | – | – | – | 4.5816 |
| सोनखार/ठाणे | 59/A | – | 5.2946 | – | – |
| तुर्भे/ठाणे | 718,799,800, 838 to 840 | – | 3.7996 | – | – |
| वाशी/ठाणे | 17pt | – | 3.7996 | – | – |
| तुर्भे | नवीन न.भू.क्र. 1pt, 2pt, 507pt. | – | 3.1924 | – | – |
| मंडाळा/मुंबई उपनगर | 88pt, 89pt, 90pt, 91pt. नवीन न.भू.क्र. 84pt | – | 6.2468 | – | – |
| विक्रोळी/मुंबई उपनगर | स.न. 65pt, नवीन न.भू.क्र. 1pt, 209pt. | – | 15.0374 | – | – |
| **एकूण वनजमीन (57.5092 हे.)** | | **11.7116 हे.** | **37.3704 हे.** | **3.8456 हे.** | **4.5816 हे.** |

सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 202202081725373819 असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.
**(गणेश जाधव)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत-**
1. सचिव, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
2. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर.
3. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर.
4. प्रादेशिक अधिकारी (केंद्रीय), क्षेत्रीय कार्यालय, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर.
5. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई.
6. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, नागपूर.
7. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महा-कॅम्पा, नागपूर.
8. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
9. जिल्हाधिकारी, रायगड/ठाणे/मुंबई उपनगर.
10. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड/ठाणे.
11. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे.
12. उपवनसंरक्षक (प्रा.), अलिबाग/ठाणे
13. खारघर-विक्रोळी ट्रान्समिशन प्रा.लि., वांद्रे (पू), मुंबई
14. निवडनस्ती.
    1. जिल्हाधिकारी, रायगड/ठाणे/मुंबई उपनगर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड/ठाणे यांना निर्देशित करण्यात येते की, वरील आदेशाची प्रत स्थानिक संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयांचे प्रमुख यांना पाठविण्यात यावी. तसेच त्यांनी वरील आदेश त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर तसेच वरील कार्यालय प्रमुखांच्या सूचना फलकावर सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी प्रदर्शिले जातील याची खात्री करावी.
    2. खारघर-विक्रोळी ट्रान्समिशन प्रा.लि., वांद्रे (पू), मुंबई यांना निर्देशित करण्यात येते की, वन मंजुऱ्यांचे सर्व आदेश, सर्व्हे क्र., गट क्र. त्यांचे प्रत्येकाचे क्षेत्र आणि वैधानिक दर्जा इ. सह आणि केंद्र शासनाने मान्यतेच्या आदेशात घातलेल्या अटी व संरक्षित बाबी यांच्यासह एक स्थानिक भाषेतील व एक इंग्रजी भाषेतील प्रसिध्द अशा दोन दैनिक वृत्तपत्रात प्रसारित करावेत, व त्याची प्रत मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे व उपवनसंरक्षक (प्रा.), अलिबाग/ठाणे यांना पाठवावी.
    3. स्थानिक स्वराज्य संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयांचे प्रमुख यांना निर्देशित करण्यात येते की, आदेशांची प्रत मिळाल्यापासून 30 दिवसापर्यंत सदर आदेश सूचना फलकावर प्रदर्शित करावे.

# रायगडचा औरंगाबादवर विजय

## गटात प्रथम स्थान, सुपर लीग स्पर्धेकरीता पात्र



**। पनवेल । वार्ताहर ।**

नाशिक येथे सुरू असलेल्या महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या आमंत्रितांच्या स्पर्धेत, औरंगाबाद विरुद्ध गोल्फ क्लब मैदानावर खेळला. या सामन्यात पहिल्या डावातील आघाडीच्या जोरावर विजय मिळवून रायगड संघाने गटात प्रथम स्थान प्राप्त केले व सुपर लीग स्पर्धेकरता पात्र ठरण्यात यशस्वी झाला.

औरंगाबाद संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या संघाने ७१.२ षटकांमध्ये २४२ धावा केल्या. त्यांच्या आरेझ खान याने ८७ चेंडूत ६७ धावा केल्या. रायगडच्या अमय भोसले याने १७.२ षटकांत ६० धावा देऊन पाच बळी घेतले. रायगड संघाची सुरुवात खराब झाली धावफलक २३ धावात २ बळी असे दर्शवत असताना संघनायक ओम म्हात्रे १३५ चेंडूत ५८ धावा व निर्जल पाटील ८८ चेंडूत ३१ धावा या दोघांनी मिळून तिसऱ्या गड्या करता १६८ चेंडूत ८० धावांची भागीदारी केली. त्यानंतर हे दोघेही फलंदाज पाठोपाठ बाद झाल्याने रायगडचा धावफलक २ बाद १०३ वरून चार बाद १०७ असा झाला.

स्मित पाटील व पार्थ पवार यांनी १८३ चेंडूत ८६ धावांची भागीदारी करून पहिल्या डावातील आघाडीचे उद्दिष्ट दृष्टिपथात आणले. यामध्ये पार्थ पवार याने १०१ चेंडूत ३७ धावा केल्या. स्मित पाटील याने उर्वरित फलंदाजांबरोबर ३१ व २७ धावांच्या दोन छोट्या-छोट्या भागीदाऱ्या करून पहिल्या डावात आघाडी प्राप्त केली.

स्मित पाटील १३० चेंडूत ८१ धावा काढून नाबाद राहिला. रायगड संघाने ९० षटकात ९ बाद २५३ धावा केल्या व ११ धावांची पहिल्या डावात आघाडी घेतली. अशाप्रकारे रायगड संघाने आपल्या गटामध्ये अव्वल स्थान प्राप्त केले व सुपर लीग स्पर्धे करता देखील पात्रता मिळवुन इतिहास घडवला. हिंगोली नाशिक औरंगाबाद ह्या तीनही सामन्यांमध्ये चमकदार कामगिरी केलेले खेळाडू, द्रुतगती गोलंदाज अमेय पाटील १८ बळी साईराज जोशी ९ बळी ऑफ स्पिनर पैकी शौर्य गायकवाड ७ बळी, अमय भोसले ५ बळी व ओम म्हात्रे चार बळी तसेच फलंदाजांमध्ये सर्वाधिक धावा क्रिश भाइरा १५१ स्मित पाटील ११९ ओम म्हात्रे १०९ व यष्टीरक्षक पार्थ पवार ७० धावा यांनी दमदार कामगिरी केली.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी ह्या संघाचे व्यवस्थापक प्रशिक्षक जॉन्टी गिलबिले, निवड समिती सदस्य सुमित झुंझारराव , विनेश ठाकुर सर व अजित म्हात्रे या सर्वांचे विशेष कौतुक केले आहे. तसेच असोसिएशनच्या सर्व सभासदांनी देखील या संघाचे अभिनंदन केले आहे. भविष्यात या सर्व मुलांवर लक्ष देण्यात येईल असे असोसिएशनचे अध्यक्ष मते यांनी जाहीर केले.

### माणगाव येथील मंगु स्टार आयोजित क्रिकेट स्पर्धेत

# राहीला इलेव्हन निजामपूर संघास अंतिम विजेतेपद

## अक्षय म्हात्रेची सामन्यात धुवाँधार शतकी खेळी



**। माणगाव । वार्ताहर ।**

माणगाव येथील मंगु स्टार क्रिकेट क्लब आयोजित वाकडाई चषक क्रिकेट स्पर्धेत राहीला इलेव्हन निजामपूर संघाने अंतिम सामन्यात आय्यान इलेव्हन माणगाव संघाचा पराभव करीत प्रथम क्रमांक पटकाविला. अंतिम सामन्यात राहीला इलेव्हन निजामपूर संघाकडून खेळणारा अलिबागचा अक्षय म्हात्रे याने धुवाँधार नाबाद शतकी खेळी केली. त्याने केवळ २२ चेंडूत १०६ धावा फाटकाविताना १५ षट्कार व २ चौकारांची आतषबाजी करून माणगावातील क्रिकेट शौकिनांना बेहद खुश केले. या स्पर्धेत उपविजेते आय्यान क्रिकेट क्लब माणगाव संघ व्दितीय तर, तृतीय साई क्रिकेट संघ,चतुर्थ क्रमांकाचे विजेते न्हावे क्रिकेट संघा राहीले. स्पर्धेतील उत्कृष्ट फलंदाज म्हणून साई संघाचा खालिद बंदरकर, उत्कृष्ट गोलंदाज म्हणून आय्यान क्रिकेट क्लब माणगाव संघाचा गोलंदाज तेजस मोहिते तर स्पर्धेतील मालिकावीर इलेव्हन निजामपूर संघातील अक्षय म्हात्रे यांनी पटकाविला. या सर्वांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

## म ह त्त्वा चे

### आयपीएलसाठी खेलाडू सज्ज

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

यंदा २७ मार्चपासून मुंबई आणि पुणे येथे 'आयपीएल'चा १५ वा हंगाम खेळवण्यात येण्याची शक्यता असून ऑस्ट्रेलिया, इंग्लंडचे काही नामांकित खेळाडू विविध दौरे तसेच वैयक्तिक कारणांमुळे स्पर्धेतील काही सामन्यांना मुकण्याची शक्यता आहे. परंतु दक्षिण आफ्रिका क्रिकेट मंडळ आणि वेस्ट इंडिज क्रिकेट मंडळाने आपापल्या खेळाडूंना संपूर्ण 'आयपीएल' खेळण्याची मुभा दिली आहे. यंदाच्या हंगामात विंडीजचे १७, तर आफ्रिकेचे ११ खेळाडू सहभागी होणार आहेत.

### विराट खेळणार १०० वी कसोटी

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार विराट कोहली याचा शंभरावा कसोटी सामना बंगळूर ऐवजी मोहालीत होणार आहे. बीसीसीआय कडून भारत- श्रीलंका यांच्यामधील मालिकेचे वेळापत्रक मंगळवारी जाहीर करण्यात आले. विराटची ही शंभरावी कसोटी असणार आहे. दोन देशांमधील पहिला कसोटी सामना मोहाली व दुसरा कसोटी सामना बंगळूर येथे खेळवण्यात येणार आहे. दोन देशांमधील कसोटी मालिका जागतिक कसोटी चॅम्पियनशिप अंतर्गत होणार आहे.

# अलिबागच्या कराटेंपटूनी जिंकली मुंबईची ट्रॉफी

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

नुकत्याच मुंबई येथे झालेल्या मुंबई विभागीय ट्रॅडिशनल रेसलिंग स्पर्धा कांदिवली ठाकूर कॉलेज मध्ये झाल्या यामध्ये जय शोतोकान कराटे अँड स्पोर्ट अकॅडमी अलिबागच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवून सर्वात जास्त गोल्ड मेडल मिळवून प्रथम क्रमांकाची ट्रॉफी मिळवली ते पुढील प्रमाणे



**सुवर्णपदक**

जय संतोष कवळे - नवगाव
श्रमिका श्रीधर पाटील - महाजने
ऋग्वेद हेमंत म्हात्रे- हशिवरे
काव्या ऋषिकेश परब - मापगाव
कैवल्य रुपेश पाटील - वाघ्रण
भार्गव राकेश शिंदे - मेढे खार
देव निलेश पाटील - पेढांबे

**सिल्वर मेडल**

आर्य शैलेश माळी - गोंधळ पाडा
स्वरा पराग वारगे -बेलोशी
हर्षद आशिष म्हात्रे- हशिवरे
साध्वी संदेश घरात -मापगाव
शिवायनी प्रफुल्ल म्हात्रे -मिळकत खार

**ब्राँझ मेडल**

अर्णव समीर केसरकर -मापगाव
स्मिती नितीन म्हात्रे -चिडीपाडा
स्मित श्रीनिवास थले - नंदाई पाडा
स्मिती सुभाष कडवे -मिळकतखार
तन्वी सतीश केसरकर- मापगाव
रुद्र संदीप वारगे- मुरुड
विधी प्रमोद दळवी- मापगाव

या सर्व खेळाडूंना खा. गोपाल शेट्टी यांच्या उपस्थितीत विजय स्पर्धकाला प्रमाणपत्र आणि मेडल देण्यात आले. या मुलांचे मुख्य प्रशिक्षक संतोष कवळे नवगाव मार्गदर्शन लाभले उत्कृष्ट पंच म्हणून काजल पाटील, रोहन गुरव, तनया मंचेकर, यांना सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

# भारत-श्रीलंका मालिकेचे वेळापत्रक जाहीर

## ३ टी-२० सामने आणि २ कसोटी सामने खेळणार

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

बीसीसीआयने टीम इंडिया आणि श्रीलंका यांच्यातील टी-२० आणि कसोटी मालिकेच्या वेळापत्रकात बदल जाहीर केले आहे. श्रीलंकन संघाच्या भारत दौऱ्याची सुरुवात २४ फेब्रुवारीपासून टी-२० मालिकेने होईल, तर ४ मार्चपासून मोहालीमध्ये दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेला सुरुवात होईल. आधीच्या वेळापत्रकानुसार दोन्ही संघांमधील मालिका आधी २६ फेब्रुवारीपासून कसोटी सामन्यांनी सुरू होणार होती, परंतु आता वेळापत्रकात बदल करण्यात आला असून या दौऱ्याची सुरुवात टी-२० सामन्यांनी होत आहे. श्रीलंका क्रिकेटच्या विनंतीवरून टी-२० मालिका सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. श्रीलंका टी-२० संघ सध्या ऑस्ट्रेलियात आहे त्यामुळे संघाला एका बायो बबलमधून दुसऱ्या बायो बबलमध्ये जावे लागणार आहे. या मालिकेपूर्वी भारतीय संघ वेस्ट इंडिजविरुद्धची टी-२० मालिकाही खेळणार आहे. त्यामुळे भारतीय संघालाही एक बायो बबल पार करावे लागणार आहे.

बीसीसीआयने मंगळवार श्रीलंकेच्या भारत दौऱ्याचे वेळापत्रक जाहीर केले. याअंतर्गत २४ फेब्रुवारीपासून टी-२० मालिका सुरू होणार आहे. या मालिकेतील पहिला सामना लखनौमध्ये तर पुढचे दोन सामने धर्मशाळा येथे होणार आहेत. त्यानंतर तेथून संघ मोहालीला रवाना होतील, जिथे पहिला कसोटी सामना ४ मार्चपासून खेळवला जाईल, तर दुसरा कसोटी सामना १२ मार्चपासून बेंगळुरूमध्ये खेळवला जाईल.

या मालिकेत भारत आणि श्रीलंकेचे संघ डे-नाईट कसोटीही खेळणार आहेत. ही कसोटी १२ मार्चपासून बेंगळुरूमध्ये खेळवली जाणार आहे. भारतीय संघाने यापूर्वी फेब्रुवारी २०२१ मध्ये इंग्लंडविरुद्ध शेवटचा डे-नाईट कसोटी सामना खेळला होता. अहमदाबादमध्ये ही कसोटी खेळली गेली आणि दोन दिवसांत सामना संपला. टीम इंडियाने पहिल्यांदा बांगलादेशविरुद्ध डे-नाईट टेस्ट खेळली आणि जिंकली, तर ऑस्ट्रेलियात पराभव झाला.

### मालिकेचे वेळापत्रक

२४ फेब्रुवारी – पहिला ढ२० सामना, लखनौ
२६ फेब्रुवारी – दुसरा ढ२० सामना, धर्मशाळा
२७ फेब्रुवारी – तिसरा ढ२० सामना, धर्मशाळा
४–८ मार्च – पहिली कसोटी, मोहाली
मार्च १२–१६ – दुसरी कसोटी, बेंगळुरू (डे–नाईट)

# 'आयपीएल' ड्रीम इलेव्हनमध्ये पंकज विजयी

**। उरण । वार्ताहर ।**

कोणाचे नशीब कसे खूलतील हे सांगता येत नाही. चिरनेरच्या अशाच एका क्रिकेट वेड्या तरुणाला सध्या सुरू असलेल्या 'आयपीएल' स्पर्धेने धनवान केले आहे. त्याने लावलेल्या ड्रीम इलेव्हन टीमवर त्याला ३५ लाखांची लॉटरी लागली आहे. भाविकांचा श्रध्दास्थान असलेला चिरनेर गावातील श्री महागणपती पंकज ठाकूर या तरुणाला पावला आहे. स्पर्धेतील नियमानुसार ऑस्टेलिया व श्रीलंका येथील खेळाडू घेऊन ऑनलाईन ड्रीम इलेव्हन टीम तयार केली. व ऑनलाईन स्पर्धेत भाग घेतला. ड्रीम इलेव्हन टीम मधील खेळाडू योग्य पध्दतीने जमा केल्यानुसार त्यांना पॉईंट्स देण्यात येतात. ज्याने योग्य टीम तयार करून त्यातील खेळाडूंना जास्त पॉईंट मिळाले की त्या स्पर्धकाला १०० रुपयांपासून एक करोड रुपयांपर्यंत बक्षीस दिले जाते. त्यानुसार ठाकूर या तरुणाला तब्बल ३५ लाख रुपयांचे बक्षिस मिळाले आहे. या अगोदर ही चिरनेर गावातील संकेत विजय मुंबईकर या तरुणाला ड्रिम इलेव्हन टीमच्या माध्यमातून १५ लाखाचे पारितोषिक मिळाल्याने होते.

# अहमदनगर ' महापौर चषक ' राज्यस्तरीय सायकल स्पर्धा १९ फेब्रुवारीला होणार

**। अलिबाग । वार्ताहर ।**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून व हिंदूहृदय सम्राट मा. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त अहमदनगरमध्ये प्रथमच अहमदनगर 'महापौर चषक' राज्यस्तरीय सायकल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

शनिवार दिनांक १९ फेब्रुवारी रोजी होणारी ही स्पर्धा मेन ईलीट (पुरुष) गटात होईल अशी माहिती अहमदनगर महापालिकेच्या महापौर रोहिनी शेंडगे यांनी दिली.

या स्पर्धेमधील प्रथम क्रमांकास रुपये ३०,००० व चषक, द्वितीय क्रमांकास रुपये २५,००० व चषक व तृतीय क्रमांकास रुपये २०,००० व चषक देण्यात येणार आहेत. एकूण १,६५,००० रुपयांची रोख बक्षीसे पहिल्या २० क्रमांकांना देण्यात येतील. स्पर्धेची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज चौक, एस टी स्टॅण्ड जवळ, माळीवाडा, अहमदनगर येथून सकाळी ८:०० वाजता होईल.

वडाळापासून स्पर्धा अहमदनगरच्या दिशेने परत फिरेल व घोडेगाव-पांढरी पूल-घाट-जेऊर-शेंडी मार्गे-एन. आर. लॉन समोर संपेल. घाटत प्रथम येणाऱ्या स्पर्धकांस 'घाटांचा राजा' या पुरस्काराने गौरविण्यात येईल. सायकलिंग असोसिएसन ऑफ महाराष्ट्रच्या नियमानुसार होणारी ही स्पर्धा फक्त महाराष्ट्रातील सर्व पुरुष स्पर्धकांसाठी खुली आहे. ऑनलाईन पद्धतीने प्रवेशिका गुरुवार दि. १७ फेब्रुवारी पर्यंत स्वीकारण्यात येतील. सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या वेबसाईटवर प्रवेशिका लिंक उपलब्ध आहे. (cyclingassociationofmaharashtra). नोंदणी व अधिक माहितीसाठी प्रा. संजय साठे, मोबाईल - ७३८ ५०८ १२७० किंवा प्रताप जाधव, यांचेशी संपर्क साधावा.

# तिसऱ्या टी –२० सामन्यात प्रेक्षकांना प्रवेश

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारत आणि वेस्ट इंडीज यांच्यातील तीन टी २० सामन्यांची मालिका कोलकात्याच्या इडन गार्डनवर रंगणार आहे. दरम्यान, बीसीसीआयने रविवारी होणाऱ्या तिसऱ्या टी २० सामन्यात प्रेक्षकांना प्रवेश देण्याची परवानगी बंगाल क्रिकेट असोसिएशनला दिली आहे.

क्रिकेट असोसिएशन ऑफ बंगालने बीसीसीआयकडे इडन गार्डनच्या सगळ्या प्रेक्षक गॅलरींच्या अप्पर ब्लॉक स्टँडमध्ये चाहत्यांना प्रवेश देण्याची परवानगी मागितली होती. बीसीसीआयने क्रिकेट असोसिएशन ऑफ बंगालची ही विनंती बीसीसीआयने तिसऱ्या टी २० सामन्यासाठी मान्य केली आहे. बंगाल क्रिकेट बोर्डाचे प्रमुख अविषेक दालमिया यांनी सांगितले की, बीसीसीआय अध्यक्ष सौरभ गांगुलीने' इतर पदाधिकाऱ्यांबरोबर चर्चा केल्यानंतर तुमची वेस्ट इंडीजविरूद्धच्या शेवटच्या टी २० सामन्यात प्रेक्षकांसाठी इडन गार्डनची दारे उघडण्याची तुम्हाला परवानगी देत आहोत' असा मेल केला आहे.

# वॉशिंग्टन सुंदर मालिकेतून बाहेर

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**



भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील सुरू असलेल्या टी-२० मालिकेपूर्वी टीम इंडियाचा ऑलराऊंडर वॉशिंग्टन सुंदर दुखापतग्रस्त होऊन संपूर्ण मालिकेतून बाहेर झाला आहे. सुंदरला मालिकेपूर्वी दुखापत झाली असून यापुढे तो या मालिकेचा भाग नसणार आहे. सुंदर कोलकाता येथे उपस्थित असलेल्या भारतीय संघापासून वेगळा झाला आहे, आणि आता तो थेट राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये जाईल. जिथे त्याच्या दुखापतीची काळजी घेत उपचार केले जातील. सुंदरने नुकतेच एकदिवसीय मालिकेतूनच संघात पुनरागमन केले होते. दरम्यान, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने सुंदरच्या जागी अनुभवी फिरकीपटू कुलदीप यादवचा संघात संमावेश केला आहे.

# लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट आयोजित राज्यस्तरीय युवा महोत्सव साजरा

**। अलिबाग । वार्ताहर ।**



लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट, आनंदो प्लस प्रकल्पाच्या माध्यमातून संस्थेच्या महाविद्यालयात शिकत असलेल्या लाभार्थी विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा या अनुषंगाने राज्यस्तरीय युवा महोत्सव कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या युवा महोत्सवात छायाचित्रण, ब्लॉग लेखन, वादविवाद आणि व्हिडियो मेकिंग या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. १३ फेब्रुवारी रोजी व्हर्च्युअल प्लॅटफॉर्मवर राज्यस्तरीय युवा महोत्सव कार्यक्रमाची सागता झाली. वाद-विवाद स्पर्धेचे थेट सादरीकरण हे या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण होते.

संस्थेच्या संस्थापिका डॉ. विली त्यांनी संस्थेच्या सर्व विद्यार्थ्यांना उज्वल भविष्य घडवून स्वावलंबी आणि सक्षम बनण्यासाठी मार्गदर्शन केले. सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी प्रेरित केले. या कार्यक्रमात संस्थेच्या यशस्वी विद्यार्थ्यांचा आणि सर्वोकृष्ठ टास्कफोर्स ग्रुपचा गौरव करण्यात आला. स्पर्धांतील प्रथम द्वितीय विजेत्यांना सन्मानित करण्यात आले. या व्हर्च्युअल कार्यक्रमात जिल्ह्यातील कर्जत, अलिबाग, माणगाव तसेच वाशिम, जालना आणि नंदुरबार जिल्ह्यातील ७७८ विद्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दशरथ देशमुख आणि शमा सिद्दीकीकर्जत यांनी केले.

# कबड्डी स्पर्धेत टी. बी. एम. कारावी विजेता

**। गडब । वार्ताहर ।** बॉईज गडब आयोजित ज्युनियर गटाच्या कबड्डी स्पर्धेत टी.बी. एम कारावी संघाने विजेतेपद मिळविले. या स्पर्धेचे उदघाटन रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्याध्यक्ष प्रसाद भोईर, संदिप ठाकूर, दिनेश म्हात्रे, राकेश मोकल आदि मान्यवरांचे हस्ते करण्यात आले.

# नेटिझन्सकडून बप्पी लहरींना श्रद्धांजली

**वर्षा मेहता**

**। अलिबाग ।**

बप्पी लाहिरी हे १९७०-८० च्या दशकाच्या उत्तरार्धात चलते चलते, डिस्को डान्सर आणि शराबी सारख्या अनेक चित्रपटांमध्ये लोकप्रिय गाणी देण्यासाठी ओळखले जात होते. भंकस नावाचे त्याचे शेवटचे बॉलीवूड गाणे २०२० च्या बागी ३ चित्रपटासाठी होते. बप्पी लाहिरीने अनेक वर्षे संगीत उद्योगावर राज्य केले. डिस्को डान्सर, रात बाकी, पग घुंगरू, बंबई से आया मेरा दोस्त, नैनो में सपना, ताकीताकी, हमको आज कल हैं इंतेझार, तम्मा तम्मा, यांसारखे गाण्यांसाठी प्रसिद्ध होते.



SOCIAL MEDIA पडसाद

बप्पी लाहिरी शेवटचे बिग बॉस १५ मध्ये दिसले होते, जिथे ते त्यांचा नातू स्वस्तिकच्या नवीन गाणे, बच्चा पार्टीच्या लाँचच्या प्रमोशनसाठी आले होते. बिग बॉसमध्ये त्याची पहिली आणि शेवटची उपस्थिती होती. त्यांच्या निधनाची बातमी कळताच सोशल मीडियावर सिनेसृष्टीच्या सर्व कलाकारांनी तसेच त्यांच्या चाहत्यांनी शोक व्यक्त केला. त्यांचे निधन मनाला चटका लावणारे आहे,असे अनेकांनी लिहले. त्यांचा संगीतकार मुलगा बप्पा लाहिरी अमेरिकेतील लॉस एंजेलिस येथून परत येण्याची वाट पाहत असल्याने गुरुवारी अंत्यसंस्कार होणार आहेत. त्यामुळे हॅशटॅग बप्पी लहरी ट्रेंड झाले. ते भारतीय चित्रपटसृष्टीतील डिस्को किंग म्हणून ओळखले जात होते.

### सर्वेश्वर क्रिडा मंडळ नवीन देहेन आयोजित क्रिकेट स्पर्धेत

# ताडवागलेच्या खेडजाई संघाला अंतिम विजेतेपद

**। भाकरवड । वार्ताहर ।**

*अलिबाग तालुक्यातील पोयनाड ग्रामपंचायत हद्दीतील नवीन देहेन येथे सागरगड आंडरार्म क्रिकेट असोसिएशनच्या मान्यताने अध्यक्ष अविनाश पाटील भाकरवड व उपाध्यक्ष तुषार पाटील मेढेखार यांच्या मार्गदर्शनाखाली रविवार दि १३ फेब्रुवारी २०२२ रोजी सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते*

*या सामन्यासाठी उद्घाटक म्हणून रायगड जिल्हा परिषदेच्या सदस्या चित्रा पाटील, माजी उपसरपंच भूषण चवरकर, अरुण पाटील, अशोक पाटील, सुनील पाटील, जनार्दन पाटील या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.*

*या सामन्यासाठी प्रथम क्रमांकाचे भूषण चवरकर रुपये सात हजार, द्वितीय क्रमांक सुनील पाटील पाच हजार तृतीय क्रमांक शरद राऊत तीन हजार, चतुर्थ क्रमांक दीपक म्हात्रे तीन हजार, तर आकर्षक चषक प्रथम ते चतुर्थ अरुण पाटील यांच्याकडून तर स्मृती चषक स्व. अर्जुन गोरखनाथ पाटील यांच्या स्मरणार्थ प्रेमनाथ पाटील यांजकडून सामन्यातील बक्षीसे रोशन जुईकर कडून देण्यात आली होती.*



सर्वेश्वर क्रिडा मंडळ नवीन देहेन येथे आयोजित क्रिकेट सामन्यात उद्घाटन करताना जिल्हा परिषदेच्या सदस्या चित्रा पाटील व उपस्थित मान्यवर मंडळी

*या सामन्यात अंतिम विजेता खेडजाई ताडवागले, व्दितीय रुपेश इलेव्हन भाकरवड ब, तृतीय हिपहॉप बॉईज श्रीगाव, तर चतुर्थ ए सी सी देहेन यांनी पटकावला. या सामन्यात मालिकावीर सौरभ मांडवकर ताडवागले, उत्कृष्ट फलंदाज जयेश पाटील भाकरवड , उत्कृष्ट गोलंदाज कल्पेश पाटील देहेन यांना देण्यात आले या सामन्यात समालोचन रविंद्र पाटील भाकरवड व चैतन्य राऊत देहेन यांनी केले. या सामन्यासाठी सर्वेशवर क्रिडा मंडळ नवीन देहेन व ग्रामस्थ मंडळ नवीन देहेन यानी अथक परिश्रम घेतले.*

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2022)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : इब्राहीम अफगाण* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)